महाराष्ट्र जनशक्ती
ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सअॅप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती
# महाराष्ट्र जनशक्ती
मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : तिसरे | अंक : १२८ वे | दिनांक : ०३/०५/२०२६ | वार रविवार

## २०२९ ला भाजप - शिवसेना स्वतंत्रपणे लढू शकते - संजय शिरसाट



**मुंबई :** प्रत्येक पक्षाला स्वतःचा पक्ष वाढवण्याचा अधिकार असतो. राजकारणात बाँड किंवा अॅग्रीमेंट काहीही नसते. त्यामुळे भाजप व शिवसेना २०२९ ला स्वतंत्रपणे लढू शकते का? तर लढू शकते, असे विधान राज्याचे सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट यांनी केले आहे. त्यांच्या या विधानामुळे आगामी विधानसभा निवडणुकीत या दोन्ही सत्ताधारी पक्षांच्या वाटा वेगळ्या होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. यावेळी त्यांनी सत्ताधारी शिवसेनेत प्रवेश केलेल्या बच्चू कडू यांनाही टोला हाणला.

संजय शिरसाट यांनी आज पत्रकारांशी संवाद साधला. त्यात त्यांनी प्रत्येक पक्षाला स्वतःचा पक्ष वाढवण्याचा अधिकार असल्याचे सांगत उपरोक्त विधान केले. ते म्हणाले, प्रत्येक पक्षाला स्वतःचा विस्तार करण्याचा अधिकार आहे. त्यानुसार, तो आपापल्या पद्धतीने तयारी करत असतो. २०२९ ला भाजप स्वबळावर लढणार काय, तर लढू शकते. शिवसेना वेगळी लढेल काय, तर लढू शकते. कारण राजकारणात असा कोणताही बाँड किंवा अॅग्रीमेंट नसते की, येणारी निवडणूक आपण अशी लढणार आहोत किंवा तशी लढणार आहोत. आपण एका जागेसाठी शिवसेना - भाजपची युती तुटताना पाहिली आहे.

त्यामुळे त्यांनी तयारी करणे किंवा इतर पक्षांनी तयारी करणे यात काहीही गैर नाही. भाजप - शिवसेनेने तयारी केली म्हणून त्यांनी तुम्हाला थांबवलंय का? आम्ही आमची तयारी करतो, तशी सर्व पक्ष आपापली तयारी करत असतात. यात काहीच गैर नाही.

संजय शिरसाट यांनी यावेळी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षावरही निशाणा साधला. ठाकरे गटाला काँग्रेस व शरद पवार गट त्यांच्या नेत्याला पुन्हा मुख्यमंत्री करतील असे वाटत असेल, तर ते केवळ स्वप्नात वावरत आहेत. त्यांनी स्वप्न पाहण्यापेक्षा वास्तविकतेला सामोरे गेले पाहिजे. येणारे कोणतेही संकट किंवा आव्हाने स्वीकारण्याची ताकद केवळ आमच्या शिवसेनेत आहे. दुसऱ्यावर टीका करून आपला पक्ष मोठा होत नाही. आम्ही कोण काय करत आहे यापेक्षा आमचा पक्ष कसा पुढे नेता येईल याची चिंता करत असतो. स्वतःचा पक्ष वाढवण्यासाठी कुणीही कुणालाही थांबवले नाही, असे ते म्हणाले.

संजय शिरसाट यांनी यावेळी शिवसेनेत प्रवेश केलेल्या बच्चू कडू यांनाही टोला हाणला. बच्चू कडू यांना आगामी राजकारणाची दिशा माहिती आहे. त्यांनी अगोदर काँग्रेससोबत केलेला घरोबा ही काय आत्महत्या नव्हती काय? त्यांनी काँग्रेससोबत केवळ संगत केली नव्हती, तर शय्या केली होती, असे ते म्हणाले.

## कालीचरण महाराजांचा 'डिलिव्हरी जिहाद' चा आरोप, डॉक्टरांच्या हेतूवर शंका



**पुणे :** आपल्या आक्रमक आणि वादग्रस्त वक्तव्यांमुळे सातत्याने चर्चेत राहणारे कालीचरण महाराज यांनी आता डॉक्टरांवर गंभीर आरोप केले आहेत. "देशात 'डिलिव्हरी जिहाद' सुरू असून यामध्ये हिंदू डॉक्टरच आघाडीवर आहेत," असा खळबळजनक दावा त्यांनी केला आहे. हिंदू महिलांच्या प्रसूती दरम्यान सिझेरियन शस्त्रक्रियांचे वाढते प्रमाण हे डॉक्टरांनी पैशांसाठी रचलेले एक मोठे षडयंत्र असल्याचे त्यांनी म्हटले आहे.

पुण्यातील दौंड येथे आयोजित 'हिंदू विराट सभे'त बोलताना कालीचरण महाराज यांनी वैद्यकीय क्षेत्रातील प्रसूती प्रक्रियेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले. "हिंदू महिलांच्या पहिल्या प्रसूतीवेळी डॉक्टर मुद्दाम सिझेरियनचा मार्ग अवलंबतात. हिंदू बालकांच्याच गळ्यात नाळ कशी अडकते? हिंदूंचीच मुले आडवी कशी जन्माला येतात? केवळ हिंदू महिलांच्याच बाबतीत सिझेरियनचे प्रमाण जास्त का आणि मुस्लिम महिलांच्या बाबतीत ते कमी का?" असा सवाल कालीचरण महाराज यांनी उपस्थित केला.

कालीचरण महाराजांनी या प्रक्रियेला 'डिलिव्हरी जिहाद' असे नाव दिले असून यात हिंदू डॉक्टरांचा मोठा सहभाग असल्याचे म्हटले आहे. "जास्तीत जास्त पैसा कमवण्यासाठी डॉक्टरांकडून हे षडयंत्र रचले जात आहे. या माध्यमातून हिंदू समाजाला आर्थिक आणि शारीरिकदृष्ट्या कमकुवत करण्याचा प्रयत्न केला जात आहे," असा गंभीर आरोप त्यांनी आपल्या भाषणातून केला.

कालीचरण महाराजांनी कोणत्याही शास्त्रीय आधाराशिवाय थेट डॉक्टरांना आणि त्यांच्या कार्यपद्धतीला 'जिहाद'शी जोडल्यामुळे वैद्यकीय क्षेत्रातून तीव्र संताप व्यक्त केला जाण्याची शक्यता आहे. यापूर्वीही त्यांनी विविध विषयांवरून वाद ओढवून घेतला असून, आता थेट आरोग्य व्यवस्थेवरच आरोप केल्याने नवा कायदेशीर पेच निर्माण होऊ शकतो.

## राजकारणात नवा स्फोट? एकनाथ शिंदेंच्या आमदाराला भाजपकडून थेट ऑफर

**मुंबई :** राज्यातील राजकारणात पुन्हा एकदा मोठ्या घडामोडींची चाहूल लागली आहे. शिवसेना शिंदे गटासाठी धक्कादायक ठरू शकणारी परिस्थिती निर्माण झाली असून, एका आमदाराच्या हालचालींमुळे चर्चांना उधाण आले आहे. भाजपकडून थेट शिंदे गटातील एका बड्या नेत्याला पक्षप्रवेशाची ऑफर दिल्याची चर्चा रंगली असून, त्यामुळे राजकीय वातावरण तापले आहे.

कोरेगाव शहरात नुकत्याच झालेल्या एका कार्यक्रमाने या चर्चांना अधिकच बळ मिळाले. पालकमंत्री शंभूराज देसाई यांच्या उपस्थितीत शिवसेना संपर्क कार्यालय आणि तीन शाखांचे उद्घाटन करण्यात आले. मात्र, या महत्त्वाच्या कार्यक्रमाला आमदार महेश शिंदे गैरहजर राहिल्याने अनेक प्रश्न निर्माण झाले. एवढंच नव्हे, तर कार्यक्रमाच्या बॅनरवरून त्यांचा फोटोही गायब असल्याचे दिसून आले, ज्यामुळे राजकीय वर्तुळात कुजबुज सुरू झाली.

या अनुपस्थितीबाबत विचारले असता महेश शिंदे यांनी वेगळेच स्पष्टीकरण दिले. त्यांनी सांगितले की, त्यांच्या आधीच अनेक कार्यक्रम ठरलेले होते. एका दिवसात सुमारे ६८ कार्यक्रम होते, त्यात ४२ विवाह सोहळ्यांचा समावेश होता. त्यामुळे मी त्या कार्यक्रमाला उपस्थित राहू शकलो नाही, असे त्यांनी स्पष्ट केले. तसेच, फोटो वगळण्याबाबत त्यांनी फारसे महत्त्व देण्यास नकार दिला. यावेळी त्यांनी राजकारणातील वास्तवावर भाष्य करत सांगितले की, कोणीही कायमस्वरूपी पद घेऊन आलेलं नसतं. मी माझं काम प्रामाणिकपणे करत आहे आणि उर्वरित काळात विकासावरच लक्ष केंद्रित करणार आहे. त्यांनी हेही नमूद केले की, कार्यक्रमात उपस्थित असलेले काही लोक पूर्वी त्यांच्या विरोधात काम करत होते, त्यामुळे अशा गोष्टींकडे ते गांभीर्याने पाहत नाहीत.

दरम्यान, या सगळ्या घडामोडींमध्ये भाजपकडून महेश शिंदे यांना पक्षप्रवेशाची ऑफर देण्यात आल्याची माहिती समोर आली आहे. भाजपचे नेते जयकुमार गोरे यांनी याबाबत स्पष्ट भूमिका मांडली.

महेश शिंदे हे आमच्या विचारसरणीचे आहेत. त्यांना काही अडचण वाटत असेल तर त्यांनी भाजपमध्ये यावे, आम्ही त्यांचे स्वागत करू, असे त्यांनी सांगितले. सातारा जिल्ह्यात त्यांना पूर्ण पाठिंबा असल्याचेही त्यांनी नमूद केले.



# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), रविवार ०३ मे २०२६

## इकरा नगर, मोहाडी येथे महाराष्ट्र दिन आणि कामगार दिन उत्साहात संपन्न




**जळगाव :** इकरानगर, मोहाडी येथील शैक्षणिक संकुलात 'महाराष्ट्र दिन' आणि 'आंतरराष्ट्रीय कामगार दिन' अत्यंत उत्साहात आणि गौरवपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला.या सोहळ्याचे विशेष वैशिष्ट्य म्हणजे, पदाचा प्रोटोकॉल बाजूला ठेवून श्रमाचा सन्मान करण्यासाठी संस्थेचे ज्येष्ठ कर्मचारी (शिपाई) श्री. इंतेखाब आलम यांना ध्वजारोहणाचा मुख्य बहुमान देण्यात आला. सकाळी ठीक ७:४५ वाजता इकरा नगरच्या भव्य प्रांगणात हा सोहळा पार पडला. श्री. इंतेखाब आलम यांनी तिरंगा फडकवल्यानंतर उपस्थित सर्वांनी राष्ट्रगीत आणि राज्यगीताचे गायन करून मानवंदना दिली.कामगार दिनाचे औचित्य साधून एका वरिष्ठ कर्मचाऱ्याच्या हस्ते झालेला हा सन्मान उपस्थित सर्वांसाठी प्रेरणादायी ठरला.या प्रसंगी इकरा नगर संकुलातील सर्व विभागांचे प्राचार्य आणि विभाग प्रमुख प्रामुख्याने उपस्थित होते. "महाराष्ट्र राज्याचा गौरव आणि कामगारांचे योगदान या दोन्ही गोष्टी आपल्या समाजाचा कणा आहेत. ज्येष्ठ कर्मचाऱ्याच्या हस्ते ध्वजारोहण करून आम्ही त्यांच्या निष्ठेचा आणि कष्टाचा सन्मान केला आहे, "अशा भावना यावेळी व्यक्त करण्यात आल्या. कार्यक्रमाला शाळेतील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि स्थानिक कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सर्व कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले. शेवटी उपस्थितांना महाराष्ट्र दिनाच्या शुभेच्छा देऊन कार्यक्रमाची सांगता झाली.

## कालिकादेवी विद्यालयात प्राचार्य केशव भांगे यांच्या हस्ते ध्वजारोहण



**शिरूर कासार :** आदर्श शिक्षण संस्था बीड द्वारा संचलित, कालिकादेवी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात,आज ०१ मे 'महाराष्ट्र दिन' व 'जागतिक कामगार दिन' मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. याप्रसंगी विद्यालयाचे प्राचार्य केशव भांगे साहेब यांच्या हस्ते राष्ट्रपिता महात्मा गांधी व महाराष्ट्राचे शिल्पकार स्व. यशवंतराव चव्हाण यांच्या प्रतिमेचे पूजन करून 'वंदे मातरम' हे राष्ट्रगीत गायन करण्यात आले. त्यानंतर राष्ट्रीय तिरंगा ध्वजाचे ध्वजारोहण करून आपल्या भारताचे राष्ट्रगीत व महाराष्ट्र गीत सामूहिकपणे घेण्यात आले. त्यानंतर प्राचार्य केशव भांगे साहेबांनी उपस्थित असलेल्या सर्व मान्यवरांना, प्रतिष्ठित नागरिकांना, पालकांना, शिक्षक बांधवांना व सर्व विद्यार्थ्यांना 'महाराष्ट्र दिनाच्या व जागतिक कामगार दिनाच्या' मन:पूर्वक शुभेच्छा दिल्या. महाराष्ट्र शासनाच्या आदेशानुसार आज ०१ मे रोजी विद्यालयातील इ.५ वी ते ९ वी व इ.११ वी (कला,विज्ञान व वाणिज्य) शाखेतील सर्व वर्गाचा वार्षिक निकाल जाहीर करण्यात आला. आणि प्रत्येक वर्गातून 'प्रथम, द्वितीय व तृतीय'श्रेणीत आणि विशेष प्राविण्यासह उत्तीर्ण झालेल्या सर्व विद्यार्थ्यांचे, मन:पूर्वक अभिनंदन करून त्यांना पुढील शिक्षणासाठी हार्दिक शुभेच्छा दिल्या. याप्रसंगी शिरूर नगरीचे प्रथम नागरिक तथा नगराध्यक्ष मा. रोहीदास पाटील गाडेकर, वरिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विश्वास कंधारे, नगरसेवक मा.दादासाहेब हरिदास, गटनेते मा. गणेश भांडेकर, माजी सरपंच आनंद जावळे, सामाजिक कार्यकर्ते मा.युवराज सोनवणे, पत्रकार मनोज परदेशी, विद्यालयाचे पर्यवेक्षक जनार्दन काळे, उपप्राचार्य बसवेश्वर देशमाने, विज्ञान प्रमुख प्रा. संजय काकडे, परीक्षा प्रमुख प्रा. नामदेव तरकसे प्रा. महारुद्र डोंगरे, क्रीडा प्रमुख रवींद्र बडे, तसेच सर्व कनिष्ठ प्राध्यापक, वरिष्ठ प्राध्यापक, सर्व शिक्षकवृंद व शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

## जि. प. प्रा. शाळा, ठाकरवाडीचा बी. टी. एस. परीक्षेत उज्ज्वल यश




**खुलताबाद (सनिराम गावंडे) :** तालुक्यातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा पिंप्री या परिक्षा केंद्रावर दि.२६ मार्च २०२६ रोजी एकुण १८५ विद्यार्थ्यांनी बी.टी.एस( सर्च टॅलेंट सर्च २०२५-२६ ही परिक्षा दिली होती त्यापैकी जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, ठाकरवाडी केंद्र गल्ले बोरगाव येथील इयत्ता ४ थी च्या विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय यश संपादन केले आहे.या परीक्षेत रोहित रामनाथ मेंगाळ याने 126/150 गुण मिळवत जिल्ह्यात 6वा क्रमांक पटकावला. तसेच प्रसाद ज्ञानेश्वर मधे (124 गुण), गायत्री वाळूबा मेंगाळ (124 गुण, जिल्ह्यात 8वी), भावना रामदास मेंगाळ (122 गुण, जिल्ह्यात 11वी), कृष्णा सुखराम मधे (120 गुण, जिल्ह्यात 11वा), सागर वाळूबा मधे (116 गुण, जिल्ह्यात 13वा), खुशी सुरेश मधे (102 गुण, जिल्ह्यात 35वी), पूजा रामनाथ पथवे (102 गुण), गांगाड संदीप हिरामण 68 गुण आणि दुर्गा सुरेश डोके (64 गुण) यांनीही यश संपादन केले. विद्यार्थ्यांच्या या यशामागे शाळेतील शिक्षकांचे मार्गदर्शन व मुख्याध्यापकांचे नेतृत्व महत्त्वाचे ठरले.

या यशाबद्दल सर्व विद्यार्थ्यांचे तसेच शिक्षक व मुख्याध्यापकांचे सर्वत्र कौतुक होत आहे.

ADMISSION OPEN

10th, 12th and Graduate Students
Government Recognised
Job Guarantee Courses

DMLT | P.G.DMLT
X-RAY | C.T.-SCAN
E.C.G. | Radiology
Physiotherapy | Optometry
O. T. TECHNICIAN
PG Radiology

Contact: 9405109103
8830838903

# महाराष्ट्र जनशक्ती


website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), रविवार ०३ मे २०२६


## विश्वकर्मा विद्यामंदिर शाळेत महाराष्ट्र दिन उत्साहात साजरा

**छत्रपती संभाजीनगर :** विश्वकर्मा प्राथमिक, माध्यमिक इंग्लिश माध्यम शाळेत महाराष्ट्र दिनाचा कार्यक्रम मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. पंडित शिंदे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. कार्यक्रमाला अध्यक्ष प्रदिप भाले तर प्रमुख पाहुणे रमेश जोशी हे होते. यावेळी एस. एस.पैठणे, एस. के. बच्छाव यांनी महाराष्ट्र दिनाविषयी व कामगार दिनाविषयी मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे सुत्रसंचलान साक्षी रोजेकर यांनी केले.यावेळी संजय पगारे, नाजेरा शेख , शितल मुरकुटे यांची उपस्थिती होती. वार्षिक परीक्षेच्या निकालाचे प्रमाणपत्राचे वाटप करण्यात आले. यावेळी गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला.

## महाराष्ट्र दिन व बुद्ध पौर्णिमेनिमित्त सिद्धार्थ उद्यानात वाचन कट्टा; वाचनप्रेमींचा उत्स्फूर्त प्रतिसाद



**छत्रपती संभाजीनगर :** महाराष्ट्र दिन व बुद्ध पौर्णिमेनिमित्त महानायक सोशल वेलफेअर फाऊंडेशन तर्फे सिद्धार्थ उद्यान येथे वाचन कट्टा आयोजित केला होता.

यावेळी वाचनप्रेमींची मोठ्या प्रमाणात उपस्थिती होती.पुस्तक वाचन झाल्यानंतर वाचकांनी उपक्रमाची प्रशंसा केली व पुढील उपक्रमाला आवर्जून परिवारासहीत उपस्थित राहू, असे सांगितले. किशोर मगरे यांनी या उपक्रमासाठी परिश्रम घेतले.

## राज्यस्तरीय चित्र रंगभरण स्पर्धेत मनपा शाळा क्र. ४९ ची उज्ज्वल कामगिरी



शिक्षक व विद्यार्थ्यांचा सन्मान करताना नगरसेविका मा.रंजनाताई बोराडे ,मा.अँड. सुनीलभाऊ बोराडे आण्णा, मा. साहेबराव मोरे, मा.प्रकाश बोराडे, गोपाळ बैरागी व इतर मान्यवर

**नाशिक :** साई कला आविष्कार नाट्य संस्था, पुणे यांच्या पुढाकारातून आयोजित राज्यस्तरीय चित्र रंगभरण स्पर्धेचा बक्षीस वितरण सोहळा मोठ्या उत्साहात पार पडला. लोकमाता अहिल्यादेवी होळकर यांच्या जीवनावर आधारित या स्पर्धेत महाराष्ट्रभरातील हजारो विद्यार्थ्यांनी सक्रिय सहभाग घेतला.मनपा शाळा क्र. ४९, पंचक येथील २५ विद्यार्थ्यांनी या स्पर्धेत भाग घेत उल्लेखनीय यश संपादन केले. जाहीर निकालानुसार, रमा धाटे हिने प्रथम क्रमांक मिळवला, सचिन साळुंखे याने द्वितीय तर ओम शेलारने तृतीय क्रमांक पटकावत शाळेचे नाव उज्ज्वल केले.या यशामागे मुख्याध्यापक श्री. दत्तात्रय सूर्यवंशी सर यांचे प्रभावी नेतृत्व तसेच शिक्षिका वैशाली शेवाळे व सुजाता लोखंडे मॅडम यांचे सातत्यपूर्ण मार्गदर्शन लाभले. त्यांच्या प्रेरणेमुळे विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट कलाकृती साकारत स्पर्धेत आपली वेगळी ओळख निर्माण केली. महाराष्ट्र दिनाच्या औचित्याने आयोजित विशेष कार्यक्रमात विजेत्या विद्यार्थ्यांचा आणि मार्गदर्शक शिक्षकांचा मान्यवरांच्या हस्ते सन्मानचिन्ह व प्रशस्तीपत्र देऊन गौरव करण्यात आला. या वेळी मा. नगरसेविका रंजनाताई बोराडे, मा. अँड. सुनीलभाऊ बोराडे, मा. साहेबराव मोरे तसेच मा. प्रकाश बोराडे यांनी विद्यार्थ्यांच्या यशाचे मनापासून कौतुक केले.

कार्यक्रमास श्री. गोपाळ बैरागी सर, जनता विद्यालयाच्या प्राचार्या रायते मॅडम, शिक्षकवृंद व इतर मान्यवर उपस्थित होते. या प्रसंगी विद्यार्थ्यांच्या यशाचा आनंद साजरा करत भविष्यातही अशा स्पर्धांमध्ये सक्रिय सहभाग घेण्याचे आवाहन करण्यात आले.


## जिंतूर येथे बुद्ध पौर्णिमा रॅली आणि वंदना कार्यक्रम उत्साहात संपन्न



**जिंतूर (बी. डी. रामपूरकर) :** भगवान गौतम बुद्ध यांच्या जयंतीनिमित्त जिंतूर शहरात भारतीय बौद्ध महासभा शाखा जिंतूर यांच्या वतीने बुद्ध पौर्णिमा मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. यानिमित्त शहरातून भव्य रॅली काढण्यात आली असून, त्यानंतर वंदना व विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. सकाळपासूनच बौद्ध बांधवांमध्ये उत्साहाचे वातावरण होते. रॅलीमध्ये मोठ्या संख्येने महिला, युवक व ज्येष्ठ नागरिकांनी सहभाग घेतला. रॅलीदरम्यान “जय भीम”, “बुद्धम शरणं गच्छामि” अशा घोषणांनी संपूर्ण परिसर दुमदुमून गेला. सहभागी नागरिकांनी हातात धम्मध्वज व फलक घेऊन समाजाला शांती, समता व बंधुत्वाचा संदेश दिला.रॅलीनंतर आयोजित वंदना कार्यक्रमात त्रिशरण पंचशील, बुद्ध वंदना आणि धम्म प्रवचनाचे आयोजन करण्यात आले. उपस्थितांना भिक्खू महानंद यांनी त्रिशरण पंचशील देऊन भगवान बुद्ध यांच्या विचारांचे महत्त्व अधोरेखित करत समाजाने त्यांच्या शिकवणीप्रमाणे आचरण करण्याचे आवाहन केले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी भारतीय बौद्ध महासभा शाखा जिंतूर आणि समता सैनिक दल जिंतूर येथील कार्यकर्त्यांनी विशेष परिश्रम घेतले.

कार्यक्रम शांततेत आणि उत्साहपूर्ण वातावरणात पार पडल्याने सर्वत्र समाधान व्यक्त करण्यात आले.

## सत्यशोधक उच्च माध्यमिक विद्यालयाच्या यशस्वी निकालाची परंपरा कायम



आदित्य निलेश अहिरे SCI



क्षितिज प्रल्हाद निकाळजे ART



सौरभ ज्ञानेश्वर गायके COM

**गोषेगाव :** मानव विकास व पूर्नर्निर्माण संशोधन संस्था, औरंगाबाद संचलित, सत्यशोधक माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय गोषेगाव तालुका भोकरदन जिल्हा जालना येथील १२ वी आर्ट, कॉमर्स आणि विज्ञान शाखेचा नुकताच निकाल जाहीर झाला असून निकाल १००% लागला आहे. यामध्ये विज्ञान शाखेतून प्रथम क्रमांक अहिरे आदित्य निलेश ९०.००%, द्वितीय जिगे समृद्धी सर्जेराव ८९.६७% तृतीय जठार आर्यन भिमराव ८८.७३%कला शाखेमधून प्रथम क्रमांक क्षितिज प्रल्हाद निकाळजे ८०.३३%, द्वितीय पल्लवी बबनराव शिंदे ७७.६७ % तृतीय शीतल भगिनाथ गडकरी ७६.५० % वाणिज्य शाखेत प्रथम क्रमांक सौरभ ज्ञानेश्वर गायके ८४.३३ %, द्वितीय आदर्श योगेश ढोणे ८२.८३ %, तृतीय प्रथमेश राहुल जगता ७६.८३ %सर्व उत्तीर्ण विद्यार्थ्यांचे तसेच गुणवंत विद्यार्थ्यांचे संस्थेचे अध्यक्ष तथा प्राचार्य माननीय सुनीलजी वाकेकर साहेब व संस्थेच्या सचिव जयश्रीताई बनकर मॅडम यांनी हार्दिक अभिनंदन केले तसेच पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. त्याचप्रमाणे सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनीही अभिनंदन केले आहेत.


बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), रविवार ०३ मे २०२६


## जिंतूर तालुक्यात लग्नसराईत डिझेल, पेट्रोल, गॅस, रोकड टंचाई; नागरिक हैराण




**जिंतूर (बी.डी. रामपूरकर) :** भारतीय ग्राहक पंचायतची जिल्हा पुरवठा अधिकारी यांच्याकडे टंचाई दूर करण्याची मागणी जिंतूर दि ३० सध्या लग्नसराईचा हंगाम सुरू असून शहरासह ग्रामीण भागात विवाहसोहळ्यांची लगबग वाढली आहे. यातच डिझेल पेट्रोल गॅस रोकड टंचाई जाणवत आहे. हि टंचाई दूर करावी अशी मागणी अखिल भारतीय ग्राहक पंचायतच्या वतीने जिल्हा पुरवठा अधिकारी परभणी यांच्याकडे जिंतूरचे तहसीलदार यांच्यामार्फत दि २७ एप्रिल सोमवार रोजी निवेदनाद्वारे करण्यात आली आहे. सध्या लग्नसराई चालू आहे.लग्नासाठी कापड, दागदागिने, केटरिंग, मंगल कार्यालय, वाहन भाडे, वाजंत्री आदींसाठी मोठ्या प्रमाणात खर्च होत असताना बँकांमधील रोकड टंचाईमुळे नागरिक अडचणीत सापडले आहेत. एटीएम बंद किंवा मर्यादित रक्कम देत असल्याने अनेकांना वारंवार बँकांच्या फेऱ्या माराव्या लागत आहेत. दरम्यान, नवीन शैक्षणिक वर्ष सुरू होत असल्याने पालकांनाही प्रवेश फी, पुस्तके, गणवेश व इतर खर्चासाठी पैशांची गरज आहे. खात्यात पैसे असूनही वेळेवर रोख रक्कम मिळत नसल्याने पालक चिंतेत आहेत. उन्हाळी सुट्टयांमुळे गावाकडे परतणाऱ्या नागरिकांनाही प्रवास, शेतीकामे, सामाजिक व धार्मिककार्यक्रमांसाठी रोकड आवश्यक आहे.तसेच पंपावर डिझेल, पेट्रोल, मिळत नाहीत. व गॅस टंचाई जाणवत आहे. यामुळेच बांधकाम क्षेत्रातही मोठ्या प्रमाणात व्यवहार रोखीत होत असल्याने मजूर व कारागिरांच्या मजुरीत अडथळे येत आहेत. परिणामी काही ठिकाणी कामांचा वेग मंदावला आहे. व्यापारी वर्गालाही याचा फटका बसत असून बाजारपेठेतील उलाढाल घटल्याचे दिसत आहे. ग्रामीण भागात डिजिटल व्यवहाराची मर्यादित सुविधा असल्याने रोख पैशांवरच व्यवहार अवलंबून आहेत. त्यामुळे मजूर, छोटे व्यावसायिक, महिला बचत गट व रुग्ण यांनाही अडचणींना सामोरे जावे लागत आहे. रोकड इतरत्र वळवल्याची चर्चा केली असली तरी याला अधिकृत दुजोरा नाही. जिंतूर तालुक्यातील डिझेल पेट्रोल, गॅस, रोकड बँकिंग यंत्रणेने तातडीने लक्ष देऊन सर्व बँका व एटीएममध्ये पुरेशी रोकड उपलब्ध करून द्यावी. अशी मागणी अखिल भारतीय ग्राहक पंचायत च्या वतीने जिल्हा पुरवठा अधिकारी यांच्याकडे करण्यात आली आहे. या निवेदनावर जिल्हाध्यक्ष गुलाबराव शिंदे, तालुका अध्यक्ष मंचक देशमुख उपाध्यक्ष भागवत चव्हाण, सचिव सचिन रायपत्रीवार यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

## निसर्ग संगीत

सर्वांनी ऐकावे । निसर्ग संगीत ।
जीवन रंगीत । होणारच ॥१॥

निसर्गात आहे । अनामिक शक्ती ।
करू त्याची भक्ती । आनंदाने ॥२॥

पानापानातुनी । ऐकू येते टाळी ।
खुणवितो साळी । आवाजाने ॥३॥

रातकिडा गातो । झाडावर गाणी ।
मंजुळ ही वाणी । कोकिळेची ॥४॥

कोकिळेचा धून । कुहू कुहू वाजे ।
संगीतात साजे । सारेगामा ॥५॥

वाऱ्यातून येई । संगीताची ताल ।
पक्षी देती चाल । गाण्यासाठी ॥६॥

नागेश ऐकतो । निसर्गाची गाणी ।
वाहतांना पाणी । खळखळ ॥७॥



**नागेश बोंतेवाड,**
**छत्रपती संभाजीनगर**


प्रवेश सुरू
बी.ए. मराठी व उर्दू माध्यम
एम.ए मराठी, हिंदी, इंग्रजी व उर्दू
बालसंगोपन
डीप्लोमा गांधी विचार
मानवी हक्क प्रमाणपत्र
संपर्क
9405109103

दै. महाराष्ट्र जनशक्ती हे महाराष्ट्रातील मराठी भाषेत वाचले जाणारे प्रमुख ई-दैनिक आहे. आपल्या व्यवसायाची जाहिरात करून व्यवसायवृद्धी करा.

जाहिरात दर

| | | |
|---|---|---|
| १. | पूर्ण पान (मल्टीकलर) | ५०००/- |
| २. | अर्धे पान (मल्टीकलर) | ३०००/- |
| ३. | पाव पान (मल्टीकलर) | २०००/- |
| ४. | शुभेच्छा जाहिरात | ६००/- |


## मुरूम येथे वीज समस्याबद्दल आमदार प्रविण स्वामींच्या उपस्थितीत बैठक संपन्न; वीज समस्यांवर तात्काळ उपाययोजनांचे निर्देश...



**मुरूम (प्रा. सुधीर पंचगल्ले) :** मुरूम व परिसरातील वाढत्या वीज समस्यांवर तोडगा काढण्यासाठी मुरूम नगर परिषद कार्यालयात शनिवारी (ता. २) रोजी महावितरण बद्दल तक्रार निवारण बैठकीचे आयोजन करण्यात आले. आ. प्रवीण स्वामी यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या बैठकीला शेतकरी, नागरिक, व पत्रकार उपस्थित होते. दरम्यान मुरूमच्या शेतकऱ्यांनी २९ एप्रिल रोजी महावितरण कार्यल्यावर मोर्चा काढला होता. याची दखल घेत आ. प्रविण स्वामींनी आज शेतकरी व महावितरण यांची एकत्र बैठक घेऊन वीज समस्यावर तोडगा काढण्याचा प्रयत्न केला. या बैठकीत वीज समस्या बद्दल चर्चा झाली. यामध्ये गाव आणि शेतीसाठी वारंवार खंडित होणारा वीजपुरवठा, कमी दाबाचे वितरण, ट्रान्सफॉर्मर जळण्याच्या घटना, नवीन वीज जोडण्यातील विलंब आदी समस्यांवर शेतकऱ्यांनी गऱ्हाणे मांडले. विशेषतः शेतीपंपासाठी अपुरा व कमी दाबाचा वीजपुरवठा होत असल्याने विद्युत मोटारी जळत असून यामुळे आर्थिक आणि पिकांचे नुकसान होत असल्याची तक्रार शेतकऱ्यांनी मांडल्या. यावेळी स्वामी यांनी महावितरण अधिकाऱ्यांना नागरिकांच्या तक्रारी तत्काळ नोंदवून त्या वेळेत मार्गी लावण्याचे स्पष्ट निर्देश दिले. महावितरणसमोर ज्या कांही अडचणी आहेत व कुठे अडथळे निर्माण झाले आहेत. त्याबद्दल बैठक घेऊन तोडगा काढणार असल्याचे सांगितले. विज पुरवठाबद्दल नागरिकांना होणारा त्रास थांबवणे ही प्रशासनाची जबाबदारी आहे, असे ठाम मत त्यांनी व्यक्त केले. बैठकीदरम्यान काही तक्रारींचे तात्काळ निवारण करण्यात आले, तर उर्वरित प्रश्नांवर लवकरच ठोस कार्यवाही करण्याचे आश्वासन अधिकाऱ्यांनी दिले.यावेळी मुरूम शहरासाठी स्वतंत्र १३३ केव्ही उपकेंद्र सुरू करण्याची मागणी करण्यात आली. उच्च दाबाने वीजपुरवठा करणे आणि वागदरी ते आलूर वीज वाहिनीचे रखडलेले काम तातडीने सुरू करणे, केसरजवळगा येथे एकदिवसाआड होणारा वीजपुरवठा नियमित करणे, शेतीसाठी किमान ६ तासांचा सुरळीत वीजपुरवठा देण्याची मागणी शेतकऱ्यांनी केली. बैठकीला बसवराज वरनाळे, महावितरणचे कार्यकारी अभियंता बी. एस. रेकुलवाड, कनिष्ठ अभियंता सचिन वाघमारे, मुरूम ग्रामीणचे कनिष्ठ अभियंता गणेश शेंबाडकर, उमरगा ग्रामीणचे कनिष्ठ अभियंता जे. एस. हिंगमिरे उपस्थित होते. राम डोंगरे, श्रीमंत भुरे, अनिल बिराजदार, गोविंदसिंग राजपूत या शेतकऱ्यांनी बैठकीत समस्या मांडल्या. मुरूम, केसरजवळगा व बेळंब येथील शेतकरी बहुसंख्येने संख्येने उपस्थित होते. दरम्यान लोकप्रतिनिधी म्हणून मुरूम शहरात पहिल्यांदाच बैठक घेऊन शेतकऱ्यांशी संवाद साधल्याने आमदार प्रविण स्वामी यांचे आभार मानण्यात आले.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), रविवार ०३ मे २०२६


## बिल्डा येथे ६७ वा महाराष्ट्र दिन व कामगार दिन उत्साहात साजरा



**फुलंब्री :** मेहेर शिक्षण प्रसारक मंडळ संचलित भारतरत्न राजीव गांधी कनिष्ठ महाविद्यालय बिल्डा, ता.फुलंब्री येथे आज ६७ वा महाराष्ट्र दिन व कामगार दिन साजरा झाला आज ठिक सकाळी. ७:४५ वाजता महाविद्यालयात ध्वजारोहण बाहेरून व गावातील आलेल्या प्रमुख पाहुणे यांना परंपरेनुसार प्रथा मान देऊन जेष्ठ नागरिक श्री.साहेबराव गायकवाड यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले या प्रसंगी गावचे प्रथम नागरिक (संरपच) श्री.सोमनाथ मते ,श्री.सुदाम भाऊ मते (मा. सरपंच) श्री.साहेबराव मुळे (माजी कर्मचारी जिल्हा म.सहकारी बँक) तसेच युवा नेते श्री आकाश गायकवाड, श्री. नाना बोरसे, श्री. हकीम शाहा, आणी प्राचार्य संतोष पुंडगे व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी, पालक इतर सर्व उपस्थितीत होते या वेळी राष्ट्र गित व राज्य गित सामुदायिक घेण्यात आले.

## जिंतूर महामार्ग पोलीस केंद्र कार्यरत आशा शेल्हाळे यांना पोलिस महासंचालकांचे सन्मानचिन्ह प्रदान




**जिंतुर (बि. डी. रामपूरकर) :** परभणी पोलिस दलात विविधप्रकारच्या प्रवर्गात केलेल्या उत्तम कामगिरीबद्दल आणि राष्ट्रपती यांचे गुणवत्तापूर्ण सेवेचे पदक व शौर्यपदक प्राप्त पोलिस अधिकारी, अंमलदार यांना पोलिस महासंचालकांचे सन्मानचिन्ह नुकतेच एका कार्यक्रमात सफौ. आशा शेल्हाळे यांना परभणी जिल्ह्याचे पालकमंत्री तथा राज्यमंत्री मेघना साकोरे बोर्डीकर व परभणी पोलीस अधीक्षक रवींद्रसिंह परदेशी यांच्या हस्ते प्रदान करण्यात आले आहे. यामध्ये परभणी जिल्ह्यातील तीन पोलीस कर्मचाऱ्यांचा समावेश आहे. यात जिंतुर महामार्ग सुरक्षापथकाच्या सहाय्यक पोलिसउपनिरीक्षक आशा शिवाजीराव शेल्हाळे यांनी मागील पंधरा वर्षात विविध प्रकारच्या गुन्हाचा तपास यशस्वीरित्या पूर्ण करून उलगडा करून चांगली कामगिरी केल्यामुळे सन्मानचिन्ह व प्रशस्तीपत्रची दावेदार ठरली आहे यामुळे आशा शेल्हाळे यांचा सर्वस्तरातून कौतुक अभिनंदन होत असून जिंतूर महामार्गचे सहाय्यक पोलीस निरीक्षक विनायक जाधव, पोलीस निरीक्षक गजेंद्र सरवदे, पि एस आय प्रकाश नेवल, इरफानोद्दीन इनामदार, प्रताप सरनाईक, नितराज नेताम, ए एस आय मदन मेटके, सय्यद शाकीर, अतुल कांदे, अमोल शेंडगे, व्यंकटेश नरवडे, वालमिक चव्हाण, सूर्यकांत हाके, महेश केदारी यांच्यासह सर्व कर्मचाऱ्यांनी त्यांचे कौतुक व अभिनंदन केले

## सत्यशोधक विद्यालयात महाराष्ट्र दिन उत्साहात साजरा




**गोषेगाव :** मानव विकास व पूर्ण निर्माण संशोधन संस्था संचलित,सत्यशोधक माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय गोषेगाव तालुका भोकरदन, जिल्हा. जालना येथे महाराष्ट्र दिन व कामगार दिन छत्रपती शिवाजी महाराज व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून उत्साहात साजरा करण्यात आला.

याप्रसंगी ध्वजारोहण समारोह समारंभ शाळेचे पर्यवेक्षक श्री. कंकाळ एन एम यांच्या हस्ते करण्यात आला.

यावेळी शाळेतील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी तसेच विद्यार्थी उपस्थित होते. ०१मे २०२६ रोजी शाळेतील सर्व विद्यार्थ्यांना निकाल वाटप करण्यात आला. कार्यक्रम कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी संस्थेचे अध्यक्ष तथा प्राचार्य श्री. सुनीलजी वाकेकर साहेब तसेच संस्थेच्या सचिव श्रीमती जयश्रीताई बनकर मॅडम यांचे अनमोल मार्गदर्शन लाभले.


मराठवाड्यातील नं. १ चे डी.टी.पी. सेंटर

साहिल कॉम्प्युटर्स ॲण्ड मल्टी सर्व्हिसेस

डी.टी.पी. जॉब वर्क
एम.फिल-पी.एच.डी. थेसिस
मराठी, हिंदी, इंग्रजी
कलर प्रिंट स्कॅनिंग
झेरॉक्स
स्पायरल बायंडिग
लॅमिनेशन
थेसिस बायंडिग

विद्यापीठ गेट जवळ, जयसिंगपुरा, औरंगाबाद
8956362639, 8087880274, 9405109103


## श्रीकृष्ण महाविद्यालयात महाराष्ट्र दिन सोहळा संपन्न





**उमरगा : (प्रा.नागसेन कांबळे) :** तालुक्यातील गुंजोटी येथे ६६ वा महाराष्ट्र दिन मोठ्या उत्साहाने साजरा करण्यात आला. यावेळी प्रमुख उपस्थित संस्थेचे सचिव डॉ. दामोदर काका पतंगे, संस्थेचे उपाध्यक्ष प्रभाकर तात्या हिरवे, संस्थेचे संचालक डॉ. सागर पतंगे, प्रा. हिरास सर, प्रा. मालखरे, प्रा. घोडके सर उपस्थित होते. प्रारंभी प्रभाकर तात्या हिरवे यांच्या हस्ते प्रतिमेचे पूजन करण्यात आले.यावेळी बोलताना प्रा. डॉ. उमाकांत सूर्यवंशी यांनी महाराष्ट्र दिनाची सर्वोतोपरी पार्श्वभूमी सांगून अनेकांनी दिलेल्या लढ्याची माहिती दिली. ते पुढे म्हणाले की, "१ मे १९६० रोजी महाराष्ट्र राज्याची स्थापना झाली, हा दिवस मराठी माणसांच्या एकतेचा आणि स्वाभिमानाचा दिवस आहे. संत ज्ञानेश्वर, छत्रपती शिवाजी महाराज, सावित्रीबाई फुले, महात्मा ज्योतिबा फुले, स्वातंत्र्यवीर सावरकर, यांच्यासारख्या अनेक थोर महापुरुषांचा जन्म या महाराष्ट्रात झाला. महाराष्ट्राच्या जडणघडणीत डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महात्मा गांधी, महादेव गोविंद रानडे ,स्वामी विवेकानंद, लोकमान्य टिळक, संभाजी राजे यासारख्या महान समाजसुधारकांच्या बरोबरीने अनेक संत आणि महात्म्यांचे योगदान या महाराष्ट्राला लाभले आहे ,याचा आपल्याला सार्थ अभिमानच आहे. त्यांच्याच विचारांचा वसा घेऊन आपण यापुढे वाटचाल करीत आहोत. मुंबई महाराष्ट्रात सामील व्हावी, महाराष्ट्र एक स्वतंत्र राज्य म्हणून नावारूपाला येण्यासाठी अनेकांनी संघर्ष केला. उभ्या संघर्षात स्वतःला झोकून दिले. याक्षणी त्या सर्वांचे स्मरण आपण या निमित्ताने करूया आणि एक समृद्ध आणि संपन्न महाराष्ट्र उभा करण्यासाठी आपण सर्वांनी प्रयत्न करूयात असे सांगून प्रा.डॉ. उमाकांत सूर्यवंशी यांनी कामगार दिनाच्या निमित्ताने डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दिलेल्या योगदानाबद्दल विस्तृत माहिती दिली.

कार्यक्रमाच्या शेवटी तंबाखू मुक्तीच्या सामूहिक शपतेनंतर कार्यक्रमाची सांगता झाली. यावेळी महाविद्यालयातील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येनी उपस्थित होते.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), रविवार ०३ मे २०२६


## कालिकादेवी कनिष्ठ महाविद्यालयाची बारावीच्या परीक्षेत उत्तुंग भरारी...

**शिरूर कासार :** महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ पुणे,यांच्या वतीने फेब्रुवारी-मार्च २०२६ मध्ये घेण्यात आलेल्या बारावी बोर्ड परीक्षेचा निकाल जाहीर झाला असून शिरूर(कासार)येथील आदर्श शिक्षण संस्था बीड द्वारा संचलित,कालिकादेवी कनिष्ठ महाविद्यालयाने यावर्षीही बारावी बोर्ड परीक्षेच्या निकालात उच्चांक गाठला आहे.विशेषत: यावर्षी प्राचार्य केशव भांगे साहेब यांच्या संकल्पनेतून'श्री कालिका गुणवत्ता पॅटर्न' राबविला आणि बोर्डाच्या निकालातही त्याचा स्वतंत्र ठसा उमटला आहे. विज्ञान शाखेमध्ये एकूण ३१४ विद्यार्थी परीक्षेला प्रविष्ट झाले होते त्यापैकी २१६ विद्यार्थ्यांनी विशेष प्राविण्य मिळवले असून ७८ विद्यार्थी प्रथम श्रेणीत,तर ०९ द्वितीय श्रेणीत उत्तीर्ण झाले आहेत.विज्ञान शाखेचा निकाल ९९.६८ % टक्के लागला आहे. तर कला शाखेत एकूण १०७ विद्यार्थी प्रविष्ट झाले होते. त्यापैकी २१ विद्यार्थ्यांनी विशेष प्राविण्य मिळवले असून ६३ विद्यार्थी प्रथम श्रेणीत,तर १८ विद्यार्थी द्वितीय श्रेणीत व ०३ विद्यार्थी तृतीय श्रेणीत उत्तीर्ण झाले आहे. कला शाखेचा निकाल ९८.१३ % टक्के लागला आहे. तसेच वाणिज्य शाखेत एकूण ३२ विद्यार्थी प्रविष्ट झाले होते.०१ एक विद्यार्थी विशेष प्राविण्य,१९ विद्यार्थी प्रथम श्रेणीत,तर ०९ विद्यार्थी द्वितीय श्रेणीत उत्तीर्ण झाले आहेत.असा वाणिज्य शाखेचा निकाल ९०.६२ % टक्के लागला आहे.अशाप्रकारे कनिष्ठ महाविद्यालयाचा एकूण सरासरी निकाल ९८.६७ % लागला आहे.यामुळे आदर्श शिक्षण संस्थेचे सचिव,तथा माजी मंत्री जयदत्त (अण्णा) क्षीरसागर साहेब,मा.रोहित(भैय्या)क्षीरसागर ,प्रशासन अधिकारी डॉ.राजूजी मचाले साहेब,सहा.प्रशासन अधिकारी,मा.योगेशजी पवार साहेब,कार्यवाहक श्री एम.ए. राऊत सर, प्राचार्य केशव भांगे साहेब तसेच विद्यालयाचे उपप्राचार्य, पर्यवेक्षक, कनिष्ठ प्राध्यापक, शिक्षकवृंद आणि शिक्षकेत्तर कर्मचारी,सर्व पालकाने परिसरातील सर्वच सूज्ञमंडळीने उत्तीर्ण विद्यार्थ्यांचे हार्दिक-हार्दिक अभिनंदन केले असून,त्यांना पुढील शिक्षणासाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

## विठ्ठलसाई कनिष्ठ महाविद्यालयाचा बारावीचा निकाल जाहीर; विज्ञान शाखेत १००% यश

**मुरूम (प्रा. सुधीर पंचगल्ले) :** नाईक नगर, सुंदर वाडी येथील विठ्ठलसाई कनिष्ठ महाविद्यालयाचा इयत्ता बारावीचा निकाल नुकताच जाहीर झाला असून महाविद्यालयाने उल्लेखनीय यश संपादन केले आहे. विज्ञान (Science) शाखेचा निकाल शंभर टक्के लागला असून कला (Arts) शाखेचा निकाल ९० टक्के लागला आहे. या उत्कृष्ट यशामुळे महाविद्यालयात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी कठोर परिश्रम, नियमित अभ्यास आणि शिक्षकांच्या मार्गदर्शनाच्या बळावर हे यश मिळवले आहे. विशेषतः विज्ञान शाखेतील सर्व विद्यार्थी उत्तीर्ण झाल्याने महाविद्यालयाच्या गुणवत्तेची पुन्हा एकदा प्रचिती आली आहे.या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष मा. माणिकरावजी राठोड साहेब, संस्थेचे सचिव योगेशजी राठोड साहेब तसेच प्राचार्य रमेश जाधव सर यांनी सर्व विद्यार्थ्यांचे मन:पूर्वक अभिनंदन केले. तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनीही विद्यार्थ्यांच्या यशाचे कौतुक करून त्यांच्या पुढील शैक्षणिक वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.या यशामुळे विठ्ठलसाई कनिष्ठ महाविद्यालयाने परिसरात आपली शैक्षणिक गुणवत्ता सिद्ध केली असून भविष्यातही असेच यश कायम राखण्याचा संकल्प संस्थेने व्यक्त केला आहे.


मराठवाड्यातील नं. १ चे डी.टी.पी.सेंटर

साहिल कॉम्प्युटर्स अॅण्ड प्रिंटर्स

डॉ.बा.आं.म.विद्यापीठ गेटजवळ, जयसिंगपूरा, औरंगाबाद.

मो. 8087880274,8956362639, 9270446603, 9405109103

डी.टी.पी. (मराठी, हिंदी, इंग्रजी)

- प्रोजेक्ट रिपोर्ट
- डेझर्टेशन
- पीएच.डी./एम.फिल.थेसिस
- कलर प्रिंट
- डी.एड.,एम.एड.प्रोजेक्ट
- स्कॅनिंग
- स्पायरल व हार्ड बायडींग
- लॅमिनेशन


## शिवाजी महाविद्यालयात शिक्षणमहर्षी कै. लक्ष्मणराव मोहिते यांना अभिवादन



**कन्नड :** येथील शिवाजी महाविद्यालयात शिक्षणमहर्षी कै. लक्ष्मणराव मोहिते (अण्णा) यांच्या पुण्यतिथीनिमित्त त्यांच्या प्रतिमेस पुष्पांजली अर्पण करून विनम्र अभिवादन करण्यात आले. महाविद्यालयातील लक्ष्मणरावजी मोहिते ग्रंथालयात आयोजित या कार्यक्रमास प्राध्यापक, कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.कार्यक्रमाच्या प्रारंभी अण्णांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून त्यांच्या कार्यास अभिवादन करण्यात आले. यानंतर उपस्थित मान्यवरांनी त्यांच्या कार्याचा आढावा घेत त्यांच्या शैक्षणिक, सामाजिक दृष्टिकोनाची आठवण करून दिली. कार्यक्रमात महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. व्ही. एन. भोसले यांनी अण्णांच्या कार्याचा गौरव करत त्यांच्या सहवासातील विधायक कार्यकर्तुत्वाची व उपक्रमांची आठवण करून दिली. त्यांनी सांगितले की, "अण्णांनी शिक्षण क्षेत्रात दिलेले योगदान अत्यंत मोलाचे असून त्यांनी विशेषतः ग्रामीण व वंचित घटकातील विद्यार्थ्यांसाठी शिक्षणाची आग्रह धरला. पंचक्रोशीतील गरीब व होतकरू विद्यार्थ्यांप्रती त्यांना विशेष जिव्हाळा होता. गुणवत्तापूर्ण शिक्षण प्रत्येकापर्यंत पोहोचावे, या ध्येयाने त्यांनी आयुष्यभर कार्य केले", असेही त्यांनी नमूद केले.यावेळी उपप्राचार्य डॉ. बी. के. मगर, डॉ. एस. एम. पवार व एच. जी. पवार यांनीही अण्णांच्या कार्याचा आढावा घेत त्यांच्या शैक्षणिक योगदानाची माहिती दिली व त्यांच्या कार्यातून प्रेरणा घेण्याचे आवाहन केले.कार्यक्रमास मा. श्री बाबासाहेब मोहिते, आदित्य मोहिते, फार्मसी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. राहुल क्षीरसागर, प्रा. योगेश सोमवंशी, श्री विलास पवार, डॉ. सिताराम मोगल यांच्यासह महाविद्यालयातील प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

उपस्थितांनी अण्णांच्या कार्याला उजाळा देत त्यांच्या स्मृतींना आदरांजली वाहिली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन प्रा. संतोष देशमुख यांनी केले. त्यांनी अण्णांच्या जीवनकार्याचा परिचय करून दिला. आभार प्रदर्शन डॉ. अतिष मेहेत्रे यांनी मानले.

## जे.ई.एस. महाविद्यालयाची उज्वल यशाची परंपरा कायम, विद्यार्थ्यांची घवघवीत यश प्राप्ती

**जालना (प्रा. डॉ. राजेंद्र सोनवणे) :** जे ई एस महाविद्यालयाचा आर्ट, कॉमर्स, सायन्स आणि किमान कौशल्यावर आधारित व्यवसाय अभ्यासक्रम, फेब्रुवारी २०२६ मध्ये झालेल्या बारावी बोर्ड परीक्षेचा निकाल लागला असून, एकूण महाविद्यालयाचा ९२.९७ टक्के निकाल लागला आहे, विज्ञान शाखेचे ६३ विद्यार्थी विशेष प्राविण्यसह उत्तीर्ण झालेले आहेत.,तर वाणिज्य शाखेचे ७७ विद्यार्थी विशेष प्राविण्यसह उत्तीर्ण झालेले आहेत. जेइएसच्या विद्यार्थ्यांनी घवघवीत असे यश प्राप्त केलेले आहे.विज्ञान शाखेत प्रथम कु. समृद्धी सचिन तोष्णीवाल ~९०.३३% , द्वितीय कु. समृद्धी जितेंद्र भालेराव ८९.८३%, तृतीय कु. गौतमी रितेश भारवाडा ८९.०५% यांनी गुण प्राप्त केले आहेत. वाणिज्य शाखेत प्रथम अनिकेत सुमंत रांजणीकर ९४.१७%, कु. लोहिया ९४.१७%,द्वितीय कु. वैदही सोमानी ९३.६७%, कु. पूर्वा लोहिया ९३. ६७%, ओम अग्रवाल ९३.६७% तृतीय मयंक झांजरिया ९२.५०%, कुमारी रियल चोंडीया ९२.५०%, वाणिज्य शाखेत१५ विद्यार्थ्यांनी ९० टक्केपेक्षा जास्त टक्के गुण मिळवून यश संपादन केलेले आहे. कला शाखेत एक विद्यार्थी विशेष प्राविण्यासह उत्तीर्ण झालेला आहे प्रथम कु. आरती घुसंगे ७५.३३%, द्वितीय श्रेयस पट्टे ७४.८३% तर तृतीय कु. प्राची वानरे ७०.८३% गुण प्राप्त करून यश प्राप्त केलेले आहे. किमान कौशल्यावर आधारित अभ्यासक्रमाचा एकूण ८०.८२% निकाल लागलेला आहे.सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे जालना एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष श्री. पुरुषोत्तम बगडिया, सचिव श्री.श्रीनिवास भक्कड तसेच प्राचार्य डॉ.गणेश अग्निहोत्री, उपप्राचार्य प्रा.प्रवीण बाफना पर्यवेक्षक डॉ.सुमंत बिक्कड , पर्यवेक्षक प्रा. ज्ञानेश्वर धनवे तसेच महाविद्यालयाचे सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी अभिनंदन व कौतुक केलेले आहे.


प्रतिनिधी नेमणे आहे

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहेत. तालुक्यातील राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक तसेच शैक्षणिक क्षेत्राची माहिती असणाऱ्यास प्राधान्य ! इच्छुकांनी आपला अल्पपरिचय (बायोडाटा) ७५८८००५००२ या नंबरवर Whatsup करावा.

दै. महाराष्ट्र जनशक्ती हे महाराष्ट्रातील मराठी भाषेत वाचले जाणारे प्रमुख ई-दैनिक आहे. आपल्या व्यवसायाची जाहिरात करून व्यवसायवृद्धी करा.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), रविवार ०३ मे २०२६


## डॉ. रफीक झकेरिया कॉलेज फॉर वुमनच्या विद्यार्थिनींनी एचएससी परीक्षेत पुन्हा फडकवला यशाचा झेंडा

**छत्रपती संभाजीनगर :** प्राचार्य डॉ. मखदूम फारूकी यांच्या कुशल नेतृत्व व मार्गदर्शनाखाली डॉ. रफीक झकेरिया कॉलेज फॉर वुमन, नवखंडा, जुबली पार्क, छत्रपती संभाजीनगर यांनी एचएससी (इयत्ता 12वी) परीक्षा २०२६ मध्ये उल्लेखनीय यश संपादन केले आहे. विज्ञान शाखेत महाविद्यालयाने ९९.१८% इतका उत्कृष्ट निकाल नोंदवत शहर व मंडळातील अग्रगण्य महाविद्यालयांमध्ये आपले स्थान निर्माण केले आहे. तसेच कला शाखेत ९१.०७% निकालासह अनेक विद्यार्थिनींनी विशेष प्रावीण्य (डिस्टिंक्शन) व प्रथम श्रेणीत यश मिळवले आहे.संस्थेचे अध्यक्ष फरहत जमाल यांनी या उल्लेखनीय यशाबद्दल प्राचार्य, शिक्षक, विद्यार्थिनी व पालकांचे मन:पूर्वक अभिनंदन केले. त्यांनी महाविद्यालयातील शिक्षकांच्या सातत्यपूर्ण परिश्रम, समर्पण व उत्कृष्ट अध्यापन कार्याचे कौतुक करत सांगितले की, याच बांधिलकीमुळे महाविद्यालय शैक्षणिक उत्कृष्टता कायम राखण्यात यशस्वी ठरले आहे.महाविद्यालयातील गुणवंत विद्यार्थिनींमध्ये विज्ञान शाखेतून आयशा तनीम (८४.१७%) व फरिया फातिमा (८०.६७%) तसेच कला शाखेतून फातिमा लोहारवाला (८६.५७%) व मदीहा फातिमा (८४.००%) यांनी विशेष प्रावीण्य मिळवले आहे.महाविद्यालयातील शिक्षकांनी विद्यार्थिनींच्या सर्वांगीण विकासासाठी केवळ शैक्षणिक क्षेत्रातच नव्हे तर व्यक्तिमत्व विकास व व्यावसायिक प्रगतीतही महत्त्वाची भूमिका बजावली आहे. संस्थेकडून सर्वसमावेशक शिक्षण, शिस्त, नैतिक मूल्ये व सहशैक्षणिक उपक्रमांवर सातत्याने भर दिला जात असून, त्याचेच फलित या उत्कृष्ट निकालाच्या रूपाने दिसून येते.व्यवस्थापन मंडळाने विश्वास व्यक्त केला आहे की, महाविद्यालयातील विद्यार्थिनी भविष्यातही अशाच प्रकारे उत्कृष्ट यश संपादन करून संस्थेचा गौरव वाढवतील.

## सदृढ आरोग्याचा जागर माझं गाव आरोग्य संपन्न गाव अभियानाला सुरुवात



**अतनूर (प्रा. सुधीर पंचगल्ले) :** नागरिकांचे आरोग्यमान सुधारण्यासाठी शासनाने ' माझं गाव, आरोग्य संपन्न गाव ' अभियान सुरू केले आहे. या अभियानाची अंमलबजावणी दि.1 मे महाराष्ट्र दिनाच्या दिवशी अतनुरात सुरूवात करण्यात आली आहे.गावातील प्रत्येक नागरिकाला घराजवळच आरोग्यसेवा देणे, प्रतिबंधात्मक, प्रोत्साहनात्मक आरोग्यसेवा देणे, नागरिकांच्या जीवनशैलीत बदल घडवणे, आरोग्यसेवा केंद्रस्थानी ठेवून, लोकसहभागातून आरोग्यसेवा बळकट करणे हा दृष्टिकोन डोळ्यासमोर ठेवून माझं गाव, आरोग्य संपन्न गाव हे अभियान शासनाने सुरू केले आहे. या अभियानात ग्रामपंचायत केंद्रबिंदू आहे.याप्रसंगी प्राथमिक आ.केंद्र अतनूर येथील वैद्यकीय अधिकारी डॉ.सकलेन शेख, डॉ.भक्ती कोळळे, आरोग्य सहाय्यिका प्रेमिला म्हेत्रे, आरोग्य सहायक बालाजी सोनटक्के, आरोग्य निरीक्षक शेख सलमान, फार्मसिस्ट गजानन तोंडारे, वरिष्ठ लिपीक रोखपाल पांडूरंग सूर्यवंशी, शासननियुक्त ग्राहक संरक्षण परिषदेचे अशासकीय सदस्य तथा दलितमित्र बालासाहेब गोविंदराव शिंदे अतनूरकर, आरोग्य मित्र बालासाहेब गोविंदराव शिंदे अतनूरकर, ग्राहक जनजागरण व मार्गदर्शन संस्थांचे संस्थापक राज्याध्यक्ष बी.जी.शिंदे अतनूरकर, जिजामाता महिला मंडळ अतनूरच्या अध्यक्षा सौ.संध्या बाळासाहेब शिंदे अतनूरकर, वसुंधरा महिला मंडळाच्या अध्यक्षा सौ.रुक्मीणबाई पांडुरंग सोमवंशी, ग्राहक संरक्षण परिषदेचे शासन नियुक्त अशासकीय सदस्य बालासाहेब गोविंदराव शिंदे अतनूरकर, ग्राहक पंचायत महाराष्ट्र राज्य व ग्राहक समिती महाराष्ट्र राज्यांचे प्रदेश संघटक बी.जी.शिंदे सर्व आरोग्य पर्यवेक्षिका, आरोग्य सहाय्यक, आरोग्य सहाय्यिका, आरोग्य परिचारिका परिचर, सर्व आरोग्य कर्मचारी वृंद, परिचर ,सर्व गटप्रवर्तक व सर्व आशा कार्यकर्ती उपस्थित होते.या अभियानाची अंमलबजावणी करण्यासाठी तालुका समिती स्थापन करण्यात आली आहे. गटविकास अधिकारी या समितीचे अध्यक्ष असून ग्रामीण रुग्णालय वैद्यकीय अधिक्षक, बालविकास प्रकल्प अधिकारी, पाणीपुरवठा, तालुका विस्तार अधिकारी, गटशिक्षणाधिकारी, स्वयंसेवी संस्थेच्या प्रतिनिधींची नियुक्ती करण्यात आली आहे. तसेच ग्रामपंचायत पातळीवरदेखील कृती समितीची स्थापना करण्यात येणार आहे.

## प्रतिभा निकेतन उच्च माध्यमिक विद्यालयाची बारावी परीक्षेत यशाची परंपरा कायम



प्रतीक्षा संतोष गावडे कला शाखा



रिया मारुती जाने वाणिज्य शाखा



प्रणाली परमेश्वर जवळगे विज्ञान शाखा

**मुरूम (प्रा.सुधीर पंचगल्ले) :** माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या वतीने फेब्रुवारी-मार्चमध्ये घेण्यात आलेल्या बारावीच्या परीक्षेचा ऑनलाइन निकाल नुकताच जाहीर झाला. या परीक्षेत प्रतिभा निकेतन माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाने दरवर्षीप्रमाणे यंदाही आपल्या उज्वल यशाची परंपरा कायम राखली आहे. विद्यालयाचा एकूण निकाल ९३.८७ टक्के लागला असून विद्यार्थ्यांनी सर्व शाखांमध्ये घवघवीत यश संपादन केले आहे. शाखानिहाय निकालाची टक्केवारी विज्ञान ९५.६६ टक्के, वाणिज्य ९१.३० टक्के तर कला शाखेचा ८८.६३ टक्के निकाल लागला. कला शाखेत प्रतीक्षा संतोष गावडे (८८.१७ टक्के, प्रथम), माही महेश चव्हाण (७६.१७ टक्के, द्वितीय), काजल तानाजी पवार (७३.६७ टक्के, तृतीय), वाणिज्य शाखेतून रिया मारुती जाणे (८५.१७ टक्के, प्रथम), सुजाता शिवानंद जोशी (८२.१७ टक्के, द्वितीय), क्रिश अनिल बनसोडे (७२.५० टक्के, तृतीय) तर विज्ञान शाखेतून प्रणाली परमेश्वर जवळगे (८५.६७ टक्के, प्रथम), भाग्यश्री बंडाप्पा च्यारे (८५.१७ टक्के, द्वितीय), प्रेमदीप प्रकाश जिंतूरकर (८४.१७ टक्के, तृतीय) क्रमांक पटकाविला. विज्ञान शाखेतून ३७ विद्यार्थी विशेष प्राविण्य, २०६ विद्यार्थी प्रथम श्रेणी, ६६ विद्यार्थी द्वितीय श्रेणीत उत्तीर्ण झाले. वाणिज्य शाखेतून २ विद्यार्थी विशेष प्राविण्य, १३ विद्यार्थी प्रथम श्रेणी, २३ विद्यार्थी द्वितीय श्रेणीत उत्तीर्ण झाले. कला शाखेतून २ विद्यार्थी विशेष प्राविण्य, ४० विद्यार्थी प्रथम श्रेणी, ३५ विद्यार्थी द्वितीय श्रेणीत उत्तीर्ण झाले. या यशाबद्दल माजी राज्यमंत्री बसवराज पाटील, नगर शिक्षण विकास मंडळाचे अध्यक्ष बापूराव पाटील, संचालक तथा उमरगा जनता बँकेचे चेअरमन शरण पाटील, सचिव व्यंकटराव जाधव, प्राचार्य उल्हास घुरघुरे, उपप्राचार्य उमाकांत महामुनी, उपमुख्याध्यापक राधाकृष्ण कोंढारे, पर्यवेक्षक विवेकानंद परसाळगे, सर्व प्राध्यापक-प्राध्यापिका, शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी विशेष अभिनंदन केले. विद्यार्थ्यांच्या या यशाने मुरूम परिसरात पालक व नागरिकात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.प्रतिभा निकेतन उच्च माध्यमिक विद्यालयाची बारावी परीक्षेत यशाची परंपरा कायम... मुरूम, ता. उमरगा, ता. २ (प्रतिनिधी) : माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या वतीने फेब्रुवारी-मार्चमध्ये घेण्यात आलेल्या बारावीच्या परीक्षेचा ऑनलाइन निकाल नुकताच जाहीर झाला. या परीक्षेत प्रतिभा निकेतन माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाने दरवर्षीप्रमाणे यंदाही आपल्या उज्वल यशाची परंपरा कायम राखली आहे. विद्यालयाचा एकूण निकाल ९३.८७ टक्के लागला असून विद्यार्थ्यांनी सर्व शाखांमध्ये घवघवीत यश संपादन केले आहे. शाखानिहाय निकालाची टक्केवारी विज्ञान ९५.६६ टक्के, वाणिज्य ९१.३० टक्के तर कला शाखेचा ८८.६३ टक्के निकाल लागला. कला शाखेत प्रतीक्षा संतोष गावडे (८८.१७ टक्के, प्रथम), माही महेश चव्हाण (७६.१७ टक्के, द्वितीय), काजल तानाजी पवार (७३.६७ टक्के, तृतीय), वाणिज्य शाखेतून रिया मारुती जाणे (८५.१७ टक्के, प्रथम), सुजाता शिवानंद जोशी (८२.१७ टक्के, द्वितीय), क्रिश अनिल बनसोडे (७२.५० टक्के, तृतीय) तर विज्ञान शाखेतून प्रणाली परमेश्वर जवळगे (८५.६७ टक्के, प्रथम), भाग्यश्री बंडाप्पा च्यारे (८५.१७ टक्के, द्वितीय), प्रेमदीप प्रकाश जिंतूरकर (८४.१७ टक्के, तृतीय) क्रमांक पटकाविला. विज्ञान शाखेतून ३७ विद्यार्थी विशेष प्राविण्य, २०६ विद्यार्थी प्रथम श्रेणी, ६६ विद्यार्थी द्वितीय श्रेणीत उत्तीर्ण झाले. वाणिज्य शाखेतून २ विद्यार्थी विशेष प्राविण्य, १३ विद्यार्थी प्रथम श्रेणी, २३ विद्यार्थी द्वितीय श्रेणीत उत्तीर्ण झाले. कला शाखेतून २ विद्यार्थी विशेष प्राविण्य, ४० विद्यार्थी प्रथम श्रेणी, ३५ विद्यार्थी द्वितीय श्रेणीत उत्तीर्ण झाले. या यशाबद्दल माजी राज्यमंत्री बसवराज पाटील, नगर शिक्षण विकास मंडळाचे अध्यक्ष बापूराव पाटील, संचालक तथा उमरगा जनता बँकेचे चेअरमन शरण पाटील, सचिव व्यंकटराव जाधव, प्राचार्य उल्हास घुरघुरे, उपप्राचार्य उमाकांत महामुनी, उपमुख्याध्यापक राधाकृष्ण कोंढारे, पर्यवेक्षक विवेकानंद परसाळगे, सर्व प्राध्यापक-प्राध्यापिका, शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी विशेष अभिनंदन केले. विद्यार्थ्यांच्या या यशाने मुरूम परिसरात पालक व नागरिकात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.


१२ वी सायन्स व B.Sc. पास विद्यार्थ्यांसाठी

शासन मान्यताप्राप्त जॉबगॅरंटी कोर्सेस

DMLT
कालावधी २ वर्ष
पात्रता : १२ वी सायन्स

PGDMLT
कालावधी दिड वर्ष (३ सेमिस्टर)
पात्रता : B.Sc.
(Microbiology, Chemistry, Botany, Zoology, Biochemistry, MLT, CLS)

X-RAY
कालावधी १ वर्ष
पात्रता : १०वी ,१२ वी पास

C.T.SCAN
कालावधी १ वर्ष
पात्रता : १०वी ,१२ वी पास

E.C.G.
कालावधी १ वर्ष
पात्रता : १०वी ,१२ वी पास

O.T. TECHNICIAN
कालावधी २ वर्ष
पात्रता : १०वी ,१२ वी पास

PG RADIOLOGY
कालावधी दिड वर्ष (३ सेमिस्टर)
पात्रता : B.Sc. Physics

रेडिओलॉजी
कालावधी २ वर्ष
पात्रता : १२ वी सायन्स पास

फिजिओथेरपी
कालावधी २ वर्ष
पात्रता : १२ वी सायन्स पास

ऑप्थोमेट्री
कालावधी २ वर्ष
पात्रता : १२ वी सायन्स पास

9405109103 | 8830838903

महाराष्ट्र जनशक्ती
website: www.maharashtrajanshaktinews.com
छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), रविवार ०३ मे २०२६

# बद्रीनारायण बारवाले महाविद्यालयाची बारावी परीक्षेत यशाची परंपरा कायम; वाणिज्य शाखेचा निकाल १०० टक्के!


दर्शील इंचुरे


कल्याणी मांटे


वृंदा चव्हाण


नवनाथ वाखरे


श्रेया खंदारे

**जालना :** स्थानिक बद्रीनारायण बारवाले महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (बारावी) परीक्षेत आपल्या दैदीप्यमान यशाची परंपरा यंदाही यशस्वीरित्या कायम राखली आहे. वाणिज्य, कला आणि विज्ञान या तिन्ही शाखांतील विद्यार्थ्यांनी परीक्षेत घवघवीत यश संपादन करून महाविद्यालयाच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे.

वाणिज्य शाखेचा 'शतकी' निकाल : यावर्षी महाविद्यालयाच्या वाणिज्य शाखेचा निकाल १०० टक्के लागला असून विद्यार्थ्यांनी यशाचा नवा उच्चांक प्रस्थापित केला आहे. विशेष उल्लेखनीय बाब म्हणजे, अनेक विद्यार्थ्यांनी 'पाली' आणि 'आयटी' (IT) या विषयांमध्ये १०० पैकी १०० गुण मिळवून विशेष प्राविण्य प्राप्त केले आहे.

वाणिज्य शाखेतील गुणवंत विद्यार्थी : दर्शिल इंचुरे (९३.८३), दिशा अग्रवाल (९३.६७) , कल्याणी मांटे (९३.३३), वृंदा चव्हाण (९१.१७), मुकुंद शिंदे (८७.६७), मोहन शिंदे (८७.००)

कला व विज्ञान शाखेतही यशाचा डंका : कला शाखेतील विद्यार्थ्यांनी आपल्या सातत्यपूर्ण कामगिरीच्या जोरावर उत्कृष्ट गुणांची कमाई केली आहे. तसेच विज्ञान शाखेतील विद्यार्थ्यांनीही चुरशीच्या परीक्षेत आपले कसब सिद्ध केले आहे.


कला शाखेतील अव्वल विद्यार्थी : श्रेया खंडारे (९२.००) नवनाथ वाखरे (९०.८३), संकेत दातीर: (८९.८३), पलक भानुशाली (८९.६७), धनश्री शिराळे (८८.६७)

विज्ञान शाखेतील गुणवंत विद्यार्थी : रेखा भालमोडे (८२.८३), सारा बिंत समेदा (८०.१७), खुशबू तिवारी (७६.३३), ओंकार एकहंडे व अपूर्वा बदर (७५.००)

विद्यार्थ्यांच्या या नेत्रदीपक यशाबद्दल महाविद्यालय व्यवस्थापन समितीने आनंद व्यक्त केला आहे. प्रभारी प्राचार्य डॉ. भूषण नाफडे आणि माजी प्राचार्य डॉ. कविता प्राशर यांच्यासह सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून त्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या. आहेत.

"विद्यार्थ्यांची जिद्द आणि शिक्षकांचे योग्य मार्गदर्शन यामुळेच महाविद्यालयाने आपले शैक्षणिक वर्चस्व टिकवून ठेवले आहे," असे प्रतिपादन यावेळी महाविद्यालय प्रशासनातर्फे करण्यात आले.

# पाटोद्याच्या जय भवानी महाविद्यालयाची बारावी बोर्ड परीक्षेत निकालाची यशस्वी परंपरा या वर्षी ही कायम




**पाटोदा (प्रतिनिधी) :** पाटोदा येथिल जय भवानी शिक्षण प्रसारक मंडळाचे कला व विज्ञान महाविद्यालयाने महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाने फेब्रुवारी २०२६ मध्ये घेतलेल्या बारावी (१२वी) बोर्ड परीक्षांचे निकाल घोषीत झाले आहेत.या निकालात या वर्षी ही जयभवानी महाविद्यालयाने निकालाची यशस्वी परंपरा कायम राखली आहे. महाविद्यालयाचा विज्ञान शाखेचा एकुण निकाल १००% लागला असुन. विज्ञान शाखेतुन गुणानुक्रमे सर्व प्रथम येण्याचा मान कु.गवळी वर्षा नारायण ७९.५०%गुण घेऊन मिळविला आहे.तर सर्व द्वितीय कु. मळेकर सानिका युवराज ७६.५०% सर्व तृतीय घाडगे प्रथमेश हनुमान ७६.१७%चतुर्थ कु.काळे मयुरी अशोक ७६.००% या विद्यार्थ्यांनी विशेष यश मिळविले आहे.तर कला शाखेतुन सर्व प्रथम कु.लांडे स्नेहा भरत ६६.५०%सर्व द्वितीय सोनवणे मनोजकुमार भास्कर ६४.००%सर्व तृतीय कु.राऊत गिताजंली मारोती, खोड ओकांर बापुराव ५८.८३% गुण घेऊन विशेष यश मिळविले आहेत. आनेक विद्यार्थी विशेष प्राविण्याने उत्तीर्ण झाले आहेत.महाविद्यालय ग्रामिण भागातील विद्यार्थ्यांसाठी दिवाळी व उन्हाळी सुठ्ठ्यामध्ये मोफत वर्ग घेत असते यात नीट,जेई,सीईटी,या परिक्षेबाबत मोफत मार्गदर्शन केले जाते.या विशेष प्राविण्य मिळविलेल्या व सर्व उत्तीर्ण विद्यार्थ्यांचे संस्थेचे संस्थापक अध्यक्ष माजी मंत्री मा.श्री.शिवाजीराव दादा पंडित,अध्यक्ष माजी आ. अमरसिंह पंडित साहेब, सचिव मा.श्री. जयसिंह पंडित साहेब, आ.मा.श्री. विजयसिंह पंडित साहेब,युवा नेते मा.रणविर काका पंडित,युवा नेते पृथ्वीराजे पंडित, स्थानिक नियामक मंडळाचे सदस्य मा.श्री. दिलीपराव जाधव, मार्गर्शक प्राचार्य डॉ. विश्वास कदम सर, प्राचार्य डॉ.सदाशिव सरकटे, कनिष्ट विभागाचे प्रमुख प्रा.प्रकाश नाईकवाडे व सर्व प्राध्यापक वृंद यांनी अभिनंदन! केले व पुढील उच्च शिक्षणासाठी शुभेच्छा दिल्या. मिळविलेल्या यशामुळे महाविद्यालयाचे सर्व स्तरातुन कौतुक होत आहे.

# श्री छत्रपती शिवाजी उच्च माध्यमिक विद्यालयाचा बारावीचा निकाल ९८:३१

**उमरगा : (प्रा. नागसेन कांबळे) :** तालुक्यातील बलसूर येथील श्री. छत्रपती शिवाजी उच्च माध्यमिक विद्यालयाचा इयत्ता बारावी विज्ञान शाखेचा निकाल ९८: २६% तर कला शाखा ९८:३६% टक्के लागला असून विज्ञान शाखेतून प्रथम अस्मिता शाहुराज मातोळे ८२:३३ टक्के तर द्वितीय गायत्री बालाजी सारणे ७३:१७ , तृतीय वैष्णवी युवराज जाधव ७०:१७ टक्के आणि कला शाखेतून प्रथम प्रियंका राजेंद्र उबाळे ८८ टक्के तर द्वितीय अंजली गोविंद बिराजदार ७७:८३ आणि तृतीय अपेक्षा व्यंकट माने ७५ टक्के गुण घेऊण यशस्वी झाले. महाराष्ट्र राज्य उच्च माध्यमिक प्रमाणपत्र बोर्ड परीक्षेचा निकाल शनिवारी (ता.दोन) रोजी जाहीर झाला असून, उच्च माध्यमिक विदयालयातील विज्ञान शाखेतून २३२ विद्यार्थी परीक्षा दिली होती. त्यामध्ये एक विद्यार्थी विशेष प्राविण्यासह तर प्रथम श्रेणीत ६२ आणि १५४ विद्यार्थी द्वितीय श्रेणीत उत्तीर्ण झाले आहेत. तर कला शाखेतून विशेष प्राविण्यात तीन, प्रथम श्रेणीत २१ द्वितीय श्रेणीत ३४ विद्यार्थ्यांनी यश संपादन करुण उच्च माध्यमिकची यशाची परंपरा कायम ठेवली. संस्थेच्या अध्यक्षा शैलजाताई मगर , सचिव प्रा.सुरेश (दाजी) बिराजदार, उपाध्यक्ष गोविंदराव (तात्या) सांळुके, कोषाध्यक्ष दत्तात्रय (काका) बिराजदार, सहसचिव अशोकराव मोरे यांच्यासह सर्व संचालक, प्राचार्य जे.एन.जाधव, उपमुख्याध्यापक सतीश पटवारी, प्राध्यापक, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी यशस्वी विद्यार्थीचे अभिनंदन केले.

जाहिरात दर

| | | |
|---|---|---|
| १. | पूर्ण पान (मल्टीकलर) | ५०००/- |
| २. | अर्धे पान (मल्टीकलर) | ३०००/- |
| ३. | पाव पान (मल्टीकलर) | २०००/- |
| ४. | शुभेच्छा जाहिरात | ६००/- |


इरफान इनामदार
मो. 8956362639
8087880274
9405109103
E-mail : sahilcomputer05@gmail.com
साहिल
कॉम्प्युटर्स अँण्ड प्रिंटर्स
• डी.टी.पी.जॉब वर्क
• मराठी, हिंदी, इंग्रजी
• एम.फील-पी.एच.डी.,थेसिस
• स्पायरल / हार्ड बाईन्डींग
• लॅमिनेशन
• कलर प्रिंट
विद्यापीठ गेट जवळ, जयसिंगपूरा, औरंगाबाद.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), रविवार ०३ मे २०२६


# फितूर दिवसांचे संदर्भ : स्वप्नस्थ वर्तमानाची अस्वस्थ कविता




**श**ब्दस्नेही कवी स्वप्नील मेश्राम यांनी जाणिवपूर्वक कविता संग्रह पाठवला.त्यांच्या ऋणाईत.अतिशय धार निर्धार पुर्वक सत्यनिष्ठ भूमिका घेऊन हीकविता संयत मनोभूमिकेतून अस्सल ठणक व्यक्त करते. 'फितूर दिवसांचे संदर्भ'हे सर्वहरा समाज व्यवस्थेचं रोजचं तरुणाईचं जगणं म्हणजे आजच्या वर्तमानाचं ठळक वास्तव आहे.आजची तरुणाई,तिची करपलेली स्वप्न,जगण्याची उमेद उध्वस्त होतं चालेली.दिवस जेंव्हा फितूर होऊच उगवतो.तेव्हा इथला बेरोजगार तरुण हतबल होतो.त्याच्या स्वप्नाची कोवळी ढेसेचं खुडून टाकावी इतकी खुन्नसी व्यवस्था झाली आहे.त्याच्या जगण्याची राखरांगोळी होते.त्याचे प्रश्न चुरगळून त्याचीच दमछाक केली जाते.इथल्या तरुणाईत कमालीची सेक्युलर सजक्ता आली ती म्हणजे उद्याची क्रांतीची मशाल घेऊन या गाभडलेल्या व्यवस्थेला जाब विचारण्याची धमकया कवितेमधून येते.आज त्याच्या मनोवृत्तीला जी होरपळ दिसते आहे.ती तितक्याच संयत शब्दांने ही कविता येते.इथे तथागत सम्यक संबुध्दांच्या भावनेचा आदर आहेच तो म्हणजे मध्यम मार्ग.'बंधमुक्त निब्बाण शैलीत जगणे'आजच्या वर्तमानाचं सजग भान म्हणजे तुमच्या माझ्या हातात फक्त संघर्षरत होऊन जगत राहणे.बाबासाहेबांच्यासम्यक संविधानिक प्रजासत्ताक्तेचे काय?जळणारा, उजळणार,तळणारा, तळतळाट वर्तमान आपण अनुभवतो आहोत.आपल्या हातात स्क्रीन टच दुःखाची उद्विग्न वेदना पाहून आम्ही बोथट असंवेदनशील होतो.अहोत हे वर्तमान वास्तवाचे जागृत भान देणारी ही कविता.या कवितेने जागतिक वेदना मुखर केली आहे.आपले भारतीय भदपडे दुःख तर आहेच.पण एक सृजनशील समाजभान सम्यक समतेचा संदेश देऊन ही कविता आली आहे."कुठल्याच माणसाचा हिरवल्या जाऊ नये त्यांना मिळालेला श्वास/महा सत्तेच्या सावटाखाली/कुठल्या वस्तीचं,/शहराचं होऊ नये अफगाणिस्तान!"(पृ.९१)कवी स्वप्नील मेश्राम जी.सार्थ अभिमान आहे.नव्या युगाची भाषा जागतिक महासत्तेचेसावट, एआय अपडेट,फोटोइफेक्ट्स,चॅट जीपीटी, ग्रोक,गुगल,जेमिनी इफेक्ट, रिचार्ज, मॅसेज,रिल्स शाॅर्ट्स,डाटा जीबी,मोबाईल म्हणजे एक खेळणे ही समकालीन तरुणाईची ज्ञान साधक्ता त्यात तो कौशल्य स्किल्स घेऊन जगतो आहे.पण बेराजगार असल्याने तो आई बाबांच्या स्वप्नांची पुर्तता करु शकत नाही.या भयंकराच्या दारात तो स्पर्धा करतो आहे.त्याची वैश्विक पाऊले जागतिक होऊन जातात."ज्याचा थांबला जातो सर्वांगीण विकास तेव्हा,त्या तरुणांनी कोणती स्वप्ने पाहवी डोळ्यात?"(पृ.२५)जागतिक महामारीचा' भंयकर काळ या तरुणाईने अनुभवला.आणि जो आक्रोश नी उद्विग्नता वाट्याला आली जवळचा माणूस दुर गेला.आज मृत्यूचे सावट हे काहीच वाटतं नाही.'भाकरीची किंमत आठ रूपये'.मूलभूत गरजा तो क्षणात फोन पे करून मिळवू शकतो.ऑनलाईन होतं चाललेला माणूस,तरुण,तिसरं युद्ध,तो वाचतो, बदल,पार्सल, हजारो किलोमीटर दुर,केविन कार्टर फितूर दिवस,या कवितेने आजच्या तरुणाईचा समकाल प्रचंड आक्रोशाने मांडला आहे.ह्या काळाचा विळखा सुख देणारा नाही.जगण्याची लढाई युक्रेनसारखी.कविता अशी "नाक दाबल्याचा भास होतो, दिवस फितूर होतात. थांबल्या जातात समाधानाच्या असंख्य वाटा खुल्या मनाची कवाडं बंद होतात... लिहितो दुःखावर अनुराग निबंध, सलोखा करतो मनाचा अस्वस्थता जगू देत नाही फितूर दिवसाचे संदर्भ देताना".(पृ.३४)ही आजच्या वर्तमानाचं सशक्त वास्तव आहे.त्याच्या हातात सर्व व्यापक आहे पण तो इथल्या व्यवस्थेचा बळी झालेला आहे.भूक,तडफडते.गिधाड मरणाची वाट पाहतो.हे अस्वस्थ करणारं केविन कार्टर चं जागतिक चित्र. दुःख क्लिक करुन कवी आत्महत्या करू शकतो.ही कविता अतिशय संयत दुःखाचा पारा चढवते.म्हणजे या समकालीन वास्तवाचे तरुणाईच्या भावभावनांचे भेदक वास्तव आहे.इथली राजकिय सामाजिक, आर्थिक विषमता कायमचं आहे.'दुष्यंतची कविता, काळजाला आग लावणारी, 'साहेब' त्यांच्या पोटाची भाकर त्याला मिळू द्या,तो मुक्त असतो.तो करतो पाठपुरावा,पुण्या मुंबईची दारं ठोठवतो,किती लावली मताची किंमत, तरुणांईची हरत चालली हिंमत.विवेकी-अविवेकाची खोली तो मोजू शकतो.तो राहतो अपडेट कवी लिहितो. "कुठल्या एआयनिर्मित आईच्या हातांवर माझ्या लेकरांना तुझे घडवलेले हात दाखवावे हात म्हणून माय माझ्या तुझ्या हातांना युनेस्कोसाठी शिफारस करु शकलो नाही"..(पृ ४०)आईच्या पोळलेल्या हाताचे व्रण..ही सखेद भेदक वेदना.तो जागतिक पावलं टाकतोय या स्पेस मध्ये.तो शिक्षणासाठी अमेरिका न्युयॉर्क मध्ये गेलाय.त्याच्या स्वप्नाचा स्पेस.गावखेड्यातल्या मुली शिकली तिची स्वप्न अशीच चुरगळीली इथल्या व्यवस्थेने.एक पार्बता तिची स्वप्न माहेरी ठेवून जाते.या कवितेचा मर्मग्राही स्वप्नाचा अनुबंध म्हणजे आक्रोश आहे.या लोकशाहीत इथल्या तरूणाईचा कितीही गळा दाबला तरी ही स्वप्न सत्यात उतरण्याचा आशावाद ही कविता देऊन जाते.भविष्याचा प्रश्न,शहरात येऊन,दोन मार्क.प्रंचड अभ्यास करुनही ती टिकून राहतो आईच्या कष्टवंत हात उभारी देतात.पण एक क्रांतीचे निळे आभाळ भरून आले.बाबांनी कवीला अक्षर दिले ती कविता."सारे आभाळ उजळून निघाले दोन सुर्य एकमेकांसमोर उभे होते"आजाच्या डोळ्यात त्यांच्या नजरेतून बाबासाहेब कसे दिसतं असतील, हे आठवतो तेव्हा आमच्या घरातला माठ मला आता चवदार तळे वाटतो "(पृ.७७)'मानेभोवती दोर'यात मुठ आवळून स्वप्न वास्तवात उतरावीच लागेल.पुढे साकीर चां जगण्याचं संघर्ष प्रेरणा देणारा आहे.म्हणून चुकीच्या निर्णयातून निर्धाराचे आत्मिक बळ ही कविता देते.कारण या कवितेचा आत्मानंद म्हणजे बाबासाहेबांचे टोकदार विचार.म्हणूनप्रा.युवराज गंगाराम यांची चिंतन चिकित्सक अभ्यासक प्रस्तावनेत लिहितात,"समाजाच्या संविधानिक डोळ्यांना खोटी काल्पनिक स्वप्न दाखवून व्यक्तिस्वातंत्र्यचं पायदळी तुडवले जात आहे.समाज आणि साहित्य वेगळे नाहीतचं.त्याची गुंफण एकत्रच आहे.जर साहित्यात तुम्ही बहिष्कृत वस्त्यांची दखल घेत नसाल,तर संतसूर्य तुकाराम तुम्हाला प्यार नाही असा याचा अर्थ आहे.अशा साहित्याची पुन्हा गळाभेट होणार नाही.याचा चंगच बांधला आहे.कवी स्वप्नील मेश्राम या मातीशी इमान राखून एकरुप आहे!(पृ.१६) आयुष्याचा उत्सव करतांना चेहरा वाचून घेतलाचा पाहिजे.खोटी काल्पनिक स्वप्न आज तरुणाईची धुळधाण करते आहे.'निर्लेप प्रार्थना'यात आत्मभानांचा टाहो,ही कविता नवा आवेश व अवकाश देते.आजचा मित्र,तू समुद्र हो;जर झालास तर विशाल कर तूझे आभाळ.हे निस्सीम ध्येय पेरणारी कविता. "रिकाम्या मनाच्या आवारात घुटमळून जाऊ नकोस. ठाम रहा तुझ्या विश्वासावर हे ही दिवस निघून जातील कायमचे तू मात्र गळफास घेऊ नकोस"(पृ.५०) 'मित्रा','पहाट'भविष्याची वाट,शहराला हवी असते,स्वतःची वाट,एकाकी शहर,शिक्का, आनंदाच्या डोहात,प्रश्न विचारण्याचा काळ,या कवितेमधून जगणं,स्वप्न, भविष्याचे वर्तमान वास्तवाचे सम्यक दृष्टीने विचार केला पाहिजे.नैतिक अधिष्ठानाची सहानुभूती निर्माण करं.शहर प्रचंड गर्दीने इमारतीमय झालंय तूला आत्मविश्वासचं घर करावं लागेल.मनाला संस्काराचे आकार दे!मात्र माघार घेऊ नकोस.कवीने या सैतानी युगातील सत्य मांडले आहे.'अजब शहरात रात्रभर जेवतात लोकं 'या तुफान गर्दीतमाणूस एकाकी.कवीने आपल्या भूप्रदेशाची सल मुखर केली आहे 'शिक्का' गडचिरोली, चंद्रपूर, हिरवं जंगल आहे काळं सोनं आहे.जल, जंगल जमीन,हे सारं वारली चित्रातपहाता पण आदिम शिक्का कायमचं आहे.समकालीन वास्तवाचे तरुणाईच्या भावभावनांचे प्रश्नकिंत चटके या कवितेमधून येतात.मन पिळवटून निघते.यातील प्रतिमा 'सबकाॅन्शियस मन,असह्य वर्तमान,आटली जाते नैतिकतेची थरथर वाहणारी नदी',येईल एखादा आपलेपणाचा काॅल इन्कमिंग"बरं झालं तथागता, तुम्हाला जगण्याचा मध्यम मार्ग सापडला/नाहीतर तुम्हालाही करावं लागलं असतं आधारलिंक"(पृ. ७१)या कवितेची पाठराखण ख्यातनाम कवी समीक्षक दा.गो काळे सर लिहितात"स्वप्नील मेश्रामची कविता म्हणजे तरुणांच्या अस्वस्थ काठावरचा संयत-समंजस आवाज आहे.ज्यात अभिनिवेशाच्या पातळीवरचा अवाजवी शब्दच्छल नाही.कारण कवीने समजून घेतलेला सभोवताल एकपदरी स्वरूपाचा नाही.त्याला काळाबरोबर सामाजिक संक्रमणावस्थांचे वेगवेगळे पदर आहेत.याचं आशावादात त्यांच्या भवितव्याची स्वप्नेही आहेत.(मलपृष्ठ)ही कविता प्रिय तरुणाईस अर्पण पत्रिका 'काळाच्या पुढे पाऊल टाकत रहा.तुम्ही परिवर्तनाची मशाल आहात..!तरज्याची भाकरच कविता लिहिता लिहिता करपली.जो तरूण आहे तुम्ही ही होता कधीतरी..तसेच प्रिय आई बाबांस ही सविनय अपर्ण पाने मन गहिवरून टाकतात.कवीवर्य स्वप्नील मेश्राम जी मनःपूर्वक हार्दिक शुभेच्छा.

**कवितासंग्रह:-फितूर दिवसांचे संदर्भ**
कवी लेखक:-स्वप्नील मेश्राम, चंद्रपूर
प्रकाशक:-संजय शिंदे, अष्टगंध प्रकाशन, ठाणे
मुखपृष्ठ:-जितेंद्र सोळूंखे
रेखाटने;-प्रमोदकुमार अणेराव
प्रथमावृती:-२५फेब्रूवारी २०२५
पाठराखण:-दा.गो. काळे
मूल्य:-२००/रूपये
पुस्तक परिचय:- डॉ प्रभाकर शेळके,जालना


## जाहिरात दर

१. पूर्ण पान (मल्टीकलर) ५०००/-
२. अर्धे पान (मल्टीकलर) ३०००/-
३. पाव पान (मल्टीकलर) २०००/-
४. शुभेच्छा जाहिरात ६००/-

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), रविवार ०३ मे २०२६


# ‘मानोसना शंभर वरीस’ संपादकीय - डॉ. सुधीर रा. देवरे

०.१ प्रास्ताविक : लोककथा लहान मुलांसाठी असतात असा आपला पारंपरिक समज आहे. पण तसं नाही. म्हणून मोठ्या माणसांनी त्या वाचायच्याच नाहीत असं नाही. उलट मोठ्या माणसांनी मुद्दाम ह्या गोष्टी वाचायला हव्यात. ‘मानवाची शंभर वर्ष’ या अहिराणी लोककथा संग्रहात एकूण ५९ कथा समाविष्ट आहेत. लहानपणापासूनच मला लोककथा ऐकण्याचा आणि सांगण्याचा नाद. म्हणून भरपूर लोककथांचा संग्रह उपलब्ध. काही गोष्टी आजोनं (आईच्या आईनं) सांगितलेल्या. काही आईनं, काही वडिलांनी, काही वडील बहिणींनी सांगितलेल्या. कळायला लागलं तसं अवांतर वाचनही सुरू झालं. शाळेबाहेरही आपोआप बरंच काही खूप शिकायला मिळत होतं. पुढं मनात साचलेल्या ह्या गोष्टी इतरांना (मित्र, बहीणी, भाचे, पुतणे, माझ्या मुली, नातू, लहान मुले) सांगायला लागलो. सांगता सांगता ऐकता ऐकता कथांचा साठा दिवसेंदिवस आणखी वाढत गेला.

०.२ लोककथांचं विश्लेषण : या कथांना कोणी दंतकथा म्हणू शकतो, कोणी आख्यायिका म्हणू शकतो, तर कोणी लोककथाही म्हणेल. दंतकथेचा शब्दश: अर्थ दातापासून सांगितली गेलेली कथा. तोंडी सांगितली गेलेली गोष्ट म्हणजे दंतकथा. म्हणजेच मौखिक पध्दतीनं सांगितली गेलेली कथा. आख्यायिका ही आख्यानावरुन आलेली आहे. सांगितलं जातं ते आख्यान आणि आख्यानातून सांगितली गेलेली कथा ती आख्यायिका.

लोककथा म्हणजे लोकांमध्ये प्रचलित असलेली कथा. जी लोकांकडून घडवली जाते आणि लोक लोकांना जी कथा सांगतात, ती लोककथा. एक जण कोणाकडून कथा ऐकून ती तो दुसऱ्याला सांगतो. त्या कथेत आपल्या पदरचं अजून काही आपल्यालाही न कळत टाकलं जातं अथवा मुद्दाम पदरचं ओततो. सांगणाऱ्याची कल्पनाशक्ती-कल्पकता त्या कथेत येत असते, त्या लोककथा. लोककथा, दंतकथा आणि आख्यायिका यांच्यात खूप फरक करता येत नाही. लोककथा, दंतकथा, आख्यायिका या पूर्णपणे काल्पनिक नसतात आणि पूर्णपणे ऐतिहासिकही नसतात. काही कथांमध्ये इतिहास असला तरी त्याचं प्रमाण अल्प असतं. काही कथांमध्ये घडलेली घटना अंतर्भूत असते. पण काही लोककथा चमत्काराचं, दिव्यत्वाचं, अमानवीय असं कवच घेऊन येतात. नव्हे, लोककथा या चमत्काराशिवाय लोकमानसात रुजूच शकत नाहीत. काही लोककथा दोन भिन्न घटनांची एकच गोष्ट बनवून टाकतात तर काही लोककथा एक घटना दुसऱ्याच्या नावे नोंदवून टाकतात. विशिष्ट भौगोलिक नैसर्गिक क्षेत्रही लोककथा आपल्या कवेत घेऊन वेगळंच नाट्य लोकजीवनात आणून टाकतात.

कोणतीच आदिम मूळ लोककथा कुठला संदेश देण्यासाठी, कुठलं प्रबोधन करण्यासाठी वा अमूक मताचा प्रसार-प्रचार करण्यासाठी उदयास आलेली नसते. लोककथा ह्या लोकांच्या प्रतिभेचा सामूहिक आविष्कार होत. मूळ लोककथांत हीन वा महान तसंच विपर्यस्त वा तात्पर्यही उद्धृत नसतंच. निर्भेळ लोककथांतून दिसून येतं ती अखिल मानवजातीची सहज प्रवृत्ती. लोककथा ह्या मानवी भाव-भावनांचे पडसाद टिपत प्रवाहित होत असतात. सामाजिक, सांस्कृतिक, धार्मिक, पारंपरिक, आर्थिक, वर्गीय व वांशिक संदर्भही लोककथा जपून ठेवतात. ज्यांच्या हाती सांस्कृतिक, धार्मिक, वांशिक सत्ता असते असे मूठभर लोक लोककथांना आपल्या संस्कारांत बुडवून समाजाला तथाकथित सांस्कृतिक वळण लावण्याचाही प्रयत्न करतात. लोककथा या मौखिक व रंजनात्मक अंगानं आविष्कृत होत असल्यानं समाजाला खालच्या थरात रुजवायला कोणतीच प्रबोधनात्मक चळवळ उभारावी लागत नाही. त्यांचा प्रसार मौखिक पद्धतीनं ओट्याओट्यावर, घराघरात, चावडीवर, रानावनात, वावरात, रानात, थळ्यात, खळ्यात आपोआप होत राहतो. खरं तर लोककथा ह्या अशा ग्रामीण, आदिवासी, आदिम, अशिक्षित लोकांतूनच सांगोवांगी होत मौखिकतेनं जन्म घेत असतात. मात्र त्याला सांस्कृतिक रंग देत बोधप्रद वळण देण्याचं काम त्या त्या धार्मिक, सांस्कृतिक क्षेत्रातील पंडित करीत असतात. वरुन रंग चढवलेल्या अशा लोककथा पुन्हा संपूर्ण समाजात पुराण, कीर्तन, आख्यान, प्रवचन, भाषण, कहाणी आदी प्रकारांतून समाजात रुजवण्याचा प्रयत्न होतो. म्हणूनच मुळात एकच लोककथा देशपरत्वे, प्रांतपरत्वे, धर्मपरत्वे, पंथपरत्वे थोडीबहुत बदललेली असल्याचं लक्षात येतं. उदाहरणार्थ, इसापनीती, जातककथा, पंचतंत्र, कथासरित्सागर, बहुजनांतल्या भारतीय लोककथा, ग्रीक लोककथा, पौरात्य लोककथा, पाश्चात्य लोककथा आणि सर्वच जागतिक लोककथा यांचा तुलनात्मक अभ्यास केल्यास हे प्रतिपादन स्पष्ट होईल. कोणतीही लोककथा लक्षपूर्वक ऐकली वा काळजीपूर्वक वाचली तर तिचा आदिम मूळ भाग काय असावा आणि सांस्कृतिक पुटं चढवलेला वा धार्मिक, पंथीय शेंदूर लावलेला प्रतिक्षिप्त भाग कोणता असावा हे सहज लक्षात येतं. हाच दृष्टीकोन समोर ठेवून सध्या लोककथा ऐकत-वाचत असल्यानं कोणतीच लोककथा आज मूळ स्वरुपातील वाटत नाही. एखादी लोककथा ज्या प्रेरणा प्रसवण्यासाठी मुळात अस्तित्वात आली असावी, तीच कथा आज अशा पद्धतीनं सांगितली जाते की तिच्या मूळ प्रकृतीच्या विरुद्ध ती संदेश देऊ लागते. गाव, पानवठे, वेस, शिव, शेती, रान, नदी आदीत असलेल्या आजूबाजूतल्या विशिष्ट नैसर्गिक वा मानवी खुणा पाहून ग्रामीण लोक आपल्या ‘भावन’ला चालना देत मनातल्यामनात काही कल्पना करतात. सामुहीक कल्पनेतून लोककथा आकार घेऊ लागतात. अशा काल्पनिक गोष्टी एकमेकांना, पुढच्या पिढीला तोंडी सांगत राहतात. आणि पुढच्या काळात त्या लोककथा स्थानिकांचं संचित होऊन जातात. लोककथा, दंतकथा, आख्यायिका ह्या जसा इतिहास सांगत नाहीत, इतिहासाच्या नावानं सांगीवांगी खबरींवर गावोगाव फिरतात, तशा बखरीही अर्धसत्यच असतात. बखरी या इतिहासाचं सत्य कथन करत नाहीत तर त्या इतिहास आपल्या कल्पनेतून, आपल्या दृष्टीकोनातून मांडत असतात. म्हणजे बखरकाराच्या दृष्टीकोनातून बखर लिहिली जाते. बखरीत इतिहासाचा अंश असला तरी त्या वस्तुस्थितीचं विरुपीकरणही करु शकतात. बखर लिहिणारा बखरकार ज्या दृष्टीकोनानं पाहत असेल तसा इतिहास बखरीत येतो. सारांश, जगाच्या विविध धर्म, पंथीय आचार संहितेच्या दृष्टीकोनातून व स्थानिक बोलीतून लोककथा सर्वदूर लोकसंस्कृतीचं वाहन झालेल्या दिसून येतात.

तथाकथित विचार समाजात पेरण्यासाठी अशा वैशिष्ट्यांच्या लोककथा या संग्रहात कमी असल्या तरी सर्वदूर अशाच कथांचा प्रचार जास्त प्रमाणात होत राहतो.

०.३ लोककथांचं संश्लेषण : प्रातिनिधीक म्हणता येतील अशा ह्या लोककथा आहेत. लोककथांची भाषा कशी ओघवती आणि प्रवाही असते हे या लोककथांतून जाणवतं. लोककथेची जी आपण वैशिष्ट्ये पाहिलीत ती वैशिष्ट्ये या समग्र कथांत दृग्गोचर होताना दिसतात. लोककथेला जसं सणावळयांचं वावडं असतं तसं अंक गणितातल्या अचूक संख्यांपासूनही त्या लांब राहतात. लोककथेच्या दृष्टीनं नेमका आशय लोकांपर्यंत पोचवणं हे महत्वाचं असतं. अमूक एक घटना इसवी सन अमूक मध्ये घडली, अशी नोंद लोककथेत दिसणार नाही आणि लोककथा काळाची नोंदही नेमक्या तारखेत करणार नाही. त्यासाठी ‘खूप खूप वर्षांपूर्वी’ असे शब्द येतात. खूप तपशिलात न जाता नेमक्या शब्दांत माणसाचं, गावाचं, राजाचं, बायकोचं, देवाचं, राक्षसाचं सौष्ठव लोककथा आपल्या भाबड्या शब्दांत कथन करतात. त्यात ओघवती बोलीभाषा जशी आढळते तसेच अद्भूत चमत्कारही सहज येत राहतात. लोककथा ह्या होऊन गेलेल्या लोकांचं गुणगाण गाण्यासाठी, वाईटपण, चांगुलपण दाखवण्यासाठी आणि सरळ रस्ता दाखवण्यासाठीही अस्तित्वात येत असतात. आदर्शवादी, बोध सांगणाऱ्या लोककथा या माणसाला योग्य मार्गावर चालण्यासाठी प्रवृत्त करीत असतात. लोककथा कोणत्याही फापट पसाऱ्याला स्थान देत नाहीत. पोथीत दिसणारं शब्दसौष्ठव लोककथेत दिसत नाही. तरीही चाकोरीबध्द पोथीहून खूप श्रेष्ठ काम लोककथा करीत असतात. लोककथांवरील लोकश्रध्देचा शेंदूर खरवडून काढला तर उपोद्‌बलक तार्कीकतेनं तत्कालीक घटनांचा वेध आपण घेऊ शकतो. लोककथा कोणताही अभिनिवेश न करता जीवन अधोरेखित करत राहतात.

०.४ अनुमान : लोककथा नेहमी खऱ्या बोलत असतात. त्यांच्यातलं कथानक, इतिहास नसला तरी त्या आपल्या प्रवृत्तीशी वस्तुनिष्ठ असतात. जनमानस ऐतिहासिक व्यक्तींवर जाणूनबुजून आदर्श पुटं चढवत नाही. हाडामांसाची माणसं ती आपल्यासमोर मौखिक परंपरेतून साक्षात उभी करतात. म्हणून लोककथा, लोकपरंपरा या मानवी आहेत.

आपल्या लहानपणी अनेक लोककथा ऐकताना राजाची धाकटी मुलगी आपल्यातील प्रत्येकाला भेटलेली असते. राजा तिन्ही मुलींना विचारतो, ‘तुम्ही कोणाच्या नशिबानं जगता?’ थोरल्या दोन्ही मुली ‘तुमच्या नशिबानं’ (म्हणजे ‘बापाच्या नशिबानं’) असं म्हणत असल्या तरी तिसरी मुलगी म्हणते, ‘मी माझ्याच नशिबानं जगते.’ हे ऐकून राजाला नुसता राग येत नाही, तर राजा तिला मुद्दाम अडचणीत आणतो. तरीही ती मुलगी आपल्या कर्तृत्वानं, बुध्दीनं प्रगती करते. शेवटी एक दिवस राजा कंगाल होत स्वत: तिच्याच आश्रयाला येतो. अशा अनेक कथा आपण ऐकलेल्या असतात, ज्या लोकजीवनाचं साक्षात दर्शन घडवीत असतात.

अनेक लोककथांत नैसर्गिक न्याय मिळत असल्याचं प्रत्ययाला येतं. काही कथांत फक्त कथन वा वर्णन असतं, काहींत प्राण्यांची उपस्थिती असते, प्राणी माणसाळलेले असतात, माणसाला प्राण्यांचा लळा असतो, चांगल्या वाईट अशा दोन्ही मानवी प्रवृत्तींचं दर्शन काही लोककथांत असतं. तात्पर्य, अनुमान, बोध, आदर्श सांगणाऱ्या लोककथांत प्रक्षेप जाणवतात. लोककथांमधील काही ढोबळ तात्पर्य वा बोधही अधोरेखित होत राहतात. उदा. लाच घेणारा माणूस कुठंही टाकला तरी तो लाच घेणं बंद करत नाही. त्याच्या खिशातले नवे नियम तयार करून तो कायम लाच घेण्याची संधी तयार ठेवतो. असं तात्पर्य एखाद्या लोककथेतून दिसून येतं; अथवा एखादी गोष्ट जितकी लपवली तितकी ती वेगानं जगजाहीर होते; असंही एखादी लोककथा सांगू पहाते. मानवी मनाची ठेवण सहजासहजी सर्वदूरच्या लोककथांत बदलत नाही. शारीरिक व्यंगांची लपवालपवी करणं, पुरूष हा बायकोचा बैल असणं अथवा समाजात बायल्या असणं, ठरलेलं मरण कधीच न चुकणं, थोडी कळ काढली की संकट टळणं, मातलेल्या, माजलेल्या माणसांची खोड मोडणं, कारणाशिवाय ज्ञानाचं प्रदर्शन करणं, अज्ञान झाकायला गेलं की जास्तच उघडं पडणं, जे माणसांत शहाणपण नाही ते प्राण्यांमध्ये असणं, पक्ष्यांमध्ये कावळा हुशार असणं, देवांनी माणसांवर प्रसन्न होणं, अतिशय किरकोळ माणूस वा अतिशय लहान प्राणीही संकटात उपयोगी पडणं, चिकाटीतून स्वप्न साकारणं वगैरे गोष्टी लोककथांत दिसून येतात. वृध्द माणसांचा धाक आणि त्यांपासून घेतलेले धडे, म्हणींच्या जन्माच्या विविध कथा, गरीब बिचाऱ्या माणसांशी धनीक लोक बोलत नसल्यानं ते प्राण्यांशी बोलतात, बाईला बुध्दी नसते असे दाखवण्याचा पुरूषी प्रयत्न, राजहट्ट, बालहट्ट, पत्नीहट्ट आदींसोबत जावई साधा असतो, भोळा असतो, विसरभोळा असतो, हजरजबाबीही असतो आदी बाबीही लोककथांत उपयोजित होत राहतात. जमिनीवरील आयत्या भौगोलिक बदलांवर लोककथा जाऊन बसतात. भुतांच्या गोष्टी, ग्रामीण दैवतांच्या गोष्टी, देव आणि माणूस यांच्यात सतत सुरू असलेल्या चढाओढी, माणसाला जास्त जगण्याची हौस, मृत्यूपासून दूर पळणारा प्राणी म्हणजे माणूस, माणसाला मिळणारा शाप आणि शापातून मुक्ती, मानवी समाजात धनाने श्रीमंतीला मिळणारा मान, मानवी व नैसर्गिक नियतीचा न्याय, संकटकाळी पक्षी- प्राणी माणसांचं बाळ वाढवतात, जिद्द असेल तर मेलेल्या सापापासूनसुध्दा माणूस श्रीमंत बनू शकतो, आईची ममता, जगात पूर्ण ज्ञान कोणालाही नाही, गाढवांपासून कायम लांब रहावं, चांगल्या कर्मानं माणूस देव होऊ शकतो, वगैरे अनेक संदेश लोककथा अलीकडे देऊ लागल्या आहेत.

या पुस्तकातल्या काही लोककथांच्या शेवटी प्रस्तुत अभ्यासकानं काही टिपण्या कंसात मुद्दाम लिहिल्या आहेत. उदा. ‘(पण भूतबित असं काही नसतं. हे बोलण्यापुरतं खोटं खोटं असतं. लोक आपापसात काल्पनिक बोलतात. डोहात इतके लोक बुडाल्यामुळं लोक घाबरतात. दुसरं काही नाही.)’ अशी एक टिपणी आहे, तर दुसरी ‘(आदिवासींमध्ये शकून पाहण्याची ही एक पध्दत आहे. काहीच करता येत नसेल तर पूर्वी अडाणी म्हणजे शाळेत न गेलेले लोक अशा पध्दतीनं वागत होते. भगताच्या मनाला जे वाटायचं, ते तो सांगत असे. आणि लोक विश्वास ठेवत होते. अशी शकुन पहायची पध्दत आज चुकीची आहे.)’ वगैरे. ह्या गोष्टी वाचून वाचकांतील लहान मुलांमध्ये अंधश्रध्दा फैलावू नयेत म्हणून ह्या टिपण्या गोष्टींच्या शेवटी मुद्दाम दिल्या आहेत.

०.५ समारोप : अशा तर खूपच गोष्टी नेणिवेत दबा धरून बसलेल्या आहेत. डोक्यात विचार येताच त्या तात्काळ आठवतात. ह्या संग्रहात समाविष्ट झालेल्या गोष्टी बालपणापासूनच मनात घर करून होत्या, पण त्या तोंडी स्वरूपात. म्हणून काही आशयानं तर काही पूर्णपणे विसरून गेलो. म्हणून आज ह्या गोष्टी कागदावर लिहितांना, प्रस्तुत लेखकाच्या प्रतिभेचा स्पर्श होऊन त्यांच्यात थोडासा बदलही झाला असेल, असं वाटतं. मात्र ह्या लोककथांचा गाभा जीवंत ठेवण्याचा पुरेपूर प्रयत्न केला आहे. अहिराणीतून मराठी भाषांतर करतांनाही मुद्दाम सोपे शब्द वापरून भाषा सोपी ठेवण्याचा प्रयत्न केला आहे. एक महत्वाची गोष्टही इथं नमूद करायला हवी, ह्या सर्व गोष्टी लहानपणी ऐकलेल्या आहेत. म्हणून सांगणाऱ्याला आणि प्रस्तुत संपादकालाही ह्या गोष्टी कोणी लिहिलेल्या आहेत की काय माहीत नाही. इथं दिलेल्या काही मूळ गोष्टींचे लेखक माहीत असते तर त्यांची नावं दिली असती. तसं सांगता येत नाही, म्हणून या सगळ्याच कथांना लोककथा म्हणतो. काही गोष्टी माझ्या म्हणून लिहिल्यात आणि लक्षात आलं की आपण ह्या गोष्टी लहानपणी कदाचित लोककथा म्हणून ऐकल्या असाव्यात. अशा साशंक करणाऱ्या लिहिलेल्या कथाही लोककथा म्हणून इथं समाविष्ट करून घेतल्या. ज्या त्या मूळ अहिराणी लोककथेच्या शेवटी कथा संग्राहकाचं नाव दिलं आहेच. यातल्या काही कथा प्रस्तुत संपादकाला ज्ञात असूनही ज्या मित्रांनी आवाहनाला प्रतिसाद देत त्यांच्याकडच्या लोककथा आवर्जून पाठवल्या, त्यांचा संग्राहक म्हणून मुद्दाम नामनिर्देश केला आहे. एम. के. भामरे, विश्राम बिरारी, मगन सूर्यवंशी, धीरज जाधव यांनी आवर्जून काही कथा आठवून लिहून पाठवल्यात. पण आलेल्या विस्कळीत लोककथांचं योग्य संपादन करावं लागलं. लोककथा सांगण्याची पारंपरिक बाळबोध भाषा मुद्दाम जशीच्यातशी ठेवली आहे. काही ठिकाणी तशी ती जाणीवपूर्वक करून घ्यावी लागली. लोककथांच्या मागणीप्रमाणे काहींचा मराठीत शब्दश: तर काहींचा भावानुवाद करावा लागला. ह्यातील पंधरा कथांचं प्राथमिक स्वरूपातील मराठी भाषांतर धीरज जाधव यानं करुन दिलं. पण प्रत्येक कथेचं अंतिम प्रमाण भाषांतर प्रस्तुत संपादकालाच करावं लागलं.

शब्दालय प्रकाशनाच्या सुमतीताई लांडे, सुमीत लांडे, मुखपृष्ठकार सरदार जाधव यांचे आभार.


**• डॉ. सुधीर रा. देवरे**

(संपादक, संग्राहक, मराठी अनुवादक)



‘मानोसना शंभर वरीस’ (अहिराणी लोककथा)

संपादक : डॉ. सुधीर राजाराम देवरे

प्रकाशक : शब्दालय प्रकाशन,

मुखपृष्ठ : सरदार जाधव,

पृष्ठ संख्या : २५७, किंमत : ४५० रुपये.

(‘मानोसना शंभर वरीस’ या पुस्तकाचे संपादकीय.



इतरत्र प्रकाशित करताना लेखकाच्या नावासह ब्लॉगचा संदर्भ द्यावा ही विनंती.)

© डॉ. सुधीर राजाराम देवरे



ब्लॉगचा पत्ता :

http://sudhirdeore29.blogspot.com/



बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002